**ज्योतिषविषयक**
सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी
**तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**

दैनिक सोलापूर
# कटूसत्य
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

DIRECT ADMISSION
MBBS | MD | MS | BDS | MDS
BAMS | BUMS | BHMS
PANCHAKARMA
DERMATOLOGY | NURSING
PHARMACY
PHYSIOTHERAPY
PARAMEDICAL | VETERINARY
OPHTHALMOLOGY | FMGE
Indo Abroad Education
9326134770

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १४२ वा | शनिवार, दि. ०३ जानेवारी २०२६ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# मतदान व मतमोजणी प्रक्रियेसाठी समन्वयाने काम करावे - आयुक्त डॉ. ओम्बासे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने आज महापालिका आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मीटिंग हॉलमध्ये महत्त्वाची आढावा बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत येणाऱ्या मतदान व मतमोजणी प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या यंत्रणा, मनुष्यबळ, साहित्य, तांत्रिक सुविधा तसेच सुरक्षा व व्यवस्थापनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. मतदान केंद्रांवरील सोयी-सुविधा, ईव्हीएम यंत्रांची उपलब्धता व हाताळणी, मतमोजणी केंद्रांची तयारी, वीज, पाणी, वाहतूक, सुरक्षा व्यवस्था तसेच आपत्कालीन परिस्थितीत करावयाच्या उपाययोजनांवरही भर देण्यात आला.



यावेळी आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, शांततापूर्ण व नियोजनबद्धरीत्या पार पाडण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या स्पष्ट सूचना दिल्या. प्रत्येक विभागाने आपापली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी, वेळापत्रकानुसार कामकाज पूर्ण करावे तसेच कोणतीही त्रुटी राहणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले.निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करून मतदान व मतमोजणी प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असेही आयुक्तांनी नमूद केले. सदर बैठकीस अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, मुख्य लेखा अधिकारी रत्नराज जवळगेकर, प्र मुख्यलेखा परीक्षक सदानंद वाघमारे, सह. नगर रचना मनिष भीष्णूरकर, सह. आयुक्त गिरीष पंडित, सह आयुक्त शशिकांत भोसले, सह आयुक्त मनीषा मगर, नगर अभियंता सारिका आकुलवार, कार्यकारी अभियंता राजेश परदेशी अग्निशमन प्रमुख राकेश साळूंखे,संबंधित विभागीय अधिकारी तसेच विभागांचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# राज्यात शालेय शिक्षणात मराठी हीच अनिवार्य भाषा : मुख्यमंत्री फडणवीस

सातारा (कटूसत्य वृत्त):- राज्यात शालेय शिक्षणात मराठी हीच अनिवार्य भाषा राहील. इतर कोणतीही भारतीय भाषा अनिवार्य नसेल, ती ऐच्छिक स्वरूपात राहील. इतर भाषा कोणत्या इयत्तेपासून सुरू करायच्या याबाबतचा निर्णय डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर घेतला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. मराठी भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती महाराष्ट्राचा आत्मा आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी सातारा येथील शाहू स्टेडियममध्ये आयोजित ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी केले.

भाषाविषयक धोरण स्पष्ट करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यात मराठी भाषेची सक्ती असेल; मात्र इतर कोणत्याही भारतीय भाषेची सक्ती केली जाणार नाही. इतर भाषा ऐच्छिक असतील. यासंदर्भात अभ्यासासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली असून, तिचा अहवाल अंतिम टप्प्यात असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी संमेलनाच्या उद्घाटक ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. मृदुला गर्ग, स्वागताध्यक्ष तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, ९९ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील, ९८ व्या संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर, आमदार अतुल भोसले, मनोज घोरपडे, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, नगराध्यक्ष अमोल मोहिते, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी, भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, उद्योजक व संमेलनाचे संरक्षक फरोख कूपर, जिल्हाधिकारी संतोष पाटील तसेच साहित्य महामंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.



विश्वास पाटील यांची 'पानिपत' कादंबरी वाचताना आपल्या विचारविश्वावर खोल परिणाम झाल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मराठी मातीशी प्रामाणिक राहून इतिहास, समाज आणि माणूस केंद्रस्थानी ठेवणारे साहित्य निर्माण होणे हीच मराठी साहित्याची खरी ओळख आहे. वारकरी साहित्य, संत ज्ञानेश्वर महाराज, संत नामदेव महाराज यांच्या योगदानाचा गौरव करताना संत तुकाराम महाराजांचे विचार आणि ह्यशब्देचि रत्नेह्ण ही परंपरा आजही समाजाला दिशा देत असल्याचे त्यांनी नमूद केले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यव्यवहार कोश तयार करून मराठी भाषेला प्रशासकीय दर्जा दिला, याची आठवण करून देत मुख्यमंत्री म्हणाले की, मराठीच्या संवर्धनासाठी शासन कटिबद्ध आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला असून, आता मराठीच्या विकासासाठी केंद्र सरकारच्या सहकार्याने सकारात्मक पावले उचलली जात आहेत. मात्र, केवळ दर्जा मिळवणे पुरेसे नसून मराठीला व्यापक लोकमान्यता मिळवून देणे हे आपले ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. 'जेएनयू'सारख्या संस्थांमध्ये मराठी अध्यासन सुरू करण्यात आल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

मराठी साहित्य क्षेत्रात कोणताही हस्तक्षेप होऊ दिला जाणार नाही, अशी ग्वाही देत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, साहित्य निर्मिती ही समाजाच्या जाणिवा विस्तारण्यासाठी असते. त्यामुळे टीका आणि गौरव या दोन्हींतून सुधारण्याचा मार्ग शोधला पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.

साताऱ्याच्या साहित्यिक परंपरेचा गौरव करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आजवर झालेल्या ९८ अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांपैकी सर्वाधिक सहा संमेलनांचे आयोजन सातारा जिल्ह्यात झाले असून, सर्वाधिक १७ संमेलनाध्यक्ष हे सातारा जिल्ह्याचे भूमीपुत्र होते.

संमेलनाच्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल महाराष्ट्र साहित्य परिषद, शाहूपुरी शाखा, मावळा फाउंडेशन, सातारा तसेच सहभागी सर्व संस्थांचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी आभार मानले. या साहित्य संमेलनाच्या माध्यमातून मराठी साहित्याला नवी ऊर्जा आणि दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

संमेलनाच्या उद्घाटक डॉ. मृदुला गर्ग यांनी राष्ट्रीय स्तरावरील मराठी साहित्याचा आढावा घेताना कवी नामदेव ढसाळ, मल्लिका अमर शेख, उर्मिला पवार, शरणकुमार लिंबाळे, विजय तेंडुलकर आणि महेश एलकुंचवार यांच्या साहित्य व नाटकांचा गौरव केला.

९९ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात साताऱ्याचा गौरवशाली इतिहास उद्धृत करून मराठी साहित्याची समृद्ध परंपरा, सातारा जिल्ह्यातील साहित्यिकांचे योगदान आणि आपल्याला लिहते करणाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. तुमच्या खांद्यावर झेंडा कोणताही असो त्याचा दांडा मराठीच असायला हवा. तुमच्या खांद्यावर पालखी कोणाचीही असू दे तिचा गोंडा मराठीच असायला हवा, असे सांगतानाच मराठी भाषेच्या समृद्धीसाठी सातत्याने कार्यरत राहण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

राज्यातील सर्व एसटी बसस्थानके आणि रेल्वेस्थानक येथे वृत्तपत्रविक्रेते आणि पुस्तक विक्रेत्यांना पुन्हा दुकाने द्यावीत. तसेच सर्व जिल्हाधिकाऱ्यांच्या व तहसीलदारांच्या कार्यालयासमोर माफक दरात पुस्तक विक्रीच्या दुकानांना परवानगी द्यावी, अशा सूचना त्यांनी मांडल्या.

डॉ. तारा भवाळकर यांनी त्यांच्या कार्यकाळातील अनुभव कथन करताना, मराठी भाषा अधिक व्यापक होत असल्याचे सांगितले. गावखेड्यातील मुले मराठीत लेखन करत असून, गावोगावी साहित्य संमेलनांचे आयोजन होत असल्याचे चित्र आश्वासक आहे. ग्रामीण भागातही नवीन लेखक, प्रकाशक तयार होत आहेत. त्यांना प्रोत्साहन दिल्यास मराठीचा खऱ्या अर्थाने विकास होईल. प्रत्येकालाच आपल्या भावना अभिव्यक्त होता येत नाहीत. त्या व्यक्त करत मी फक्त समूह मनाचा आवाज झाले, असेही त्या म्हणाल्या.

स्वागताध्यक्ष शिवेंद्रसिंह भोसले यांनी साहित्य संमेलनामागील भूमिका स्पष्ट करताना, शतकपूर्व साहित्य संमेलन साताऱ्यात होत असल्याचा आनंद व्यक्त केला. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होत असलेले हे पहिलेच साहित्य संमेलन असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी मराठी साहित्य चळवळीचा आढावा घेत कर्नाटक सीमाभागातील मराठी भाषिकांच्या पाठीशी साहित्य महामंडळ ठामपणे उभे असल्याचे सांगितले.

संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोदी कुलकर्णी यांनी प्रास्ताविकात संमेलनाची सविस्तर माहिती दिली. साहित्य महामंडळाच्या कार्यवाह सुनीताराजे पवार यांनी आभार मानले.

# EVM यंत्रांच्या First Level Checking (FLC) प्रक्रियेस सुरुवात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (EVM) यंत्रांची First Level Checking (FLC) प्रक्रिया आज हुतात्मा स्मृती मंदिर, मागील बाजूस राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत राबविण्यात आली. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, विश्वासार्ह व त्रुटीरहित राहावी, या उद्देशाने FLC प्रक्रिया भारत निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार काटेकोरपणे राबविण्यात येत आहे. सदर प्रक्रिया ठराविक अनुक्रमानुसारच पूर्ण करणे बंधनकारक असून, कोणताही टप्पा अपूर्ण राहिल्यास संबंधित मतदान यंत्राचे FLC पूर्ण मानले जाणार नाही, अशी स्पष्ट सूचना देण्यात आली आहे.



**पारदर्शक निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज**

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ ही मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असून, EVM FLC प्रक्रिया हा निवडणूक व्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा असल्याचे प्रशासनाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच ३ जानेवारी व ४ जानेवारी २०२५ रोजी देखील हुतात्मा स्मृती मंदिर पाठीमागे ही प्रक्रिया सकाळी दहा वाजल्यापासून चालू असणार आहे.

**EVM FLC कार्यपद्धती**

FLC प्रक्रियेमध्ये Ballot Unit (B.U.), Control Unit (C.U.) तसेच मतदान यंत्रातील दिनांक व वेळ (Date-Time) तपासणी टप्प्याटप्प्याने करण्यात आली. Ballot Unit तपासणीदरम्यान पूर्वीच्या मतपत्रिका, स्टिकर व अ‍ॅड्रेस टॅग काढून टाकणे, Ready Lamp, Arrow Vote Light, केबल, पिन्स व सर्व बटनांची कार्यक्षमता तपासण्यात आली. मेमरी व केबल जोडताना पिन खराब होणार नाही, याची विशेष दक्षता घेण्यात आली. Control Unit तपासणीमध्ये C.U. व B.U. एकमेकांना जोडून Clear, Result, Total, Ballot, Candset आदी बटनांची कार्यक्षमता नियमानुसार तपासण्यात आली.

Ballot Unit प्रत्यक्ष चाचणीदरम्यान उमेदवारांच्या समोरील दिवे (Lamp), १ ते १६ बटनांची कार्यक्षमता तसेच END बटन वापरून मतदान प्रक्रिया पडताळण्यात आली.यानंतर EVM मधील दिनांक व वेळ २४ तासांच्या फॉरमॅटमध्ये अचूकरीत्या सेट करण्यात आली. चुकीची नोंद झाल्यास दुरुस्तीची तरतूद वापरून अंतिम Date-Time निश्चित करण्यात आली. त्रुटी नोंदणी व मॉक पोल FLC प्रक्रियेदरम्यान आढळून आलेल्या तांत्रिक त्रुटींची कारणांसह स्वतंत्र नोंदणी करण्यात येत असून, दोषयुक्त मशीनची स्वतंत्र यादी तयार करण्यात येत आहे. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची उपस्थिती FLC प्रक्रियेच्या वेळी मान्यताप्राप्त राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे पार पडली. प्रतिनिधींना FLC प्रक्रियेबाबत माहिती देण्यात आली. यावेळी प्रक्रिया सुरु असताना महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आजच्या FLC प्रक्रियेची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करण्याच्या तसेच कोणतीही तांत्रिक त्रुटी राहणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या.या पाहणीदरम्यान अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नियंत्रण अधिकारी तपन डंके, दीपक रजपूत, प्रकाश दिवानजी, शकील शेख,किशोर तळीखेडे यांच्यासह ECIL हैदराबाद या कंपनीतून दोन तज्ञ अधिकारी या चेकिंग करीता संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# साखर कारखाने वजनकाटे तपासणीसाठी भरारी पथकाची स्थापना

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जल्हि्यातील साखर कारखान्याचे वजनकाटे तपासणीकरिता भरारी पथक स्थापन करण्यात आले आहे. या पथकामध्ये वैधमापन शास्त्र विभाग, महसूल विभाग, पोलीस विभाग व प्रादेशिक सहसंचालक (साखर) व साखर कारखाना कार्यक्षेत्रातील शेतकरी प्रतिनिधींचा समावेश असल्याचे जल्हि।धकिारी कुमार आशीर्वाद यांनी प्रसध्दिी पत्रकान्वये कळवलिे आहे.

**भरारी पथकातील सदस्यांची नांवे व पदनाम पुढीलप्रमाणेः**

भरारी पथक प्रमुख हे संबंधित सर्व तालुक्यातील तहसिलदार असतील,

सदस्य सचिव हे सर्व तालुक्यातील उपनियंत्रक, वैध मापनशास्त्र विभागातील असतील,

सदस्य हे ज्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत साखर कारखाना असेल त्या पोलीस स्टेशनचे ठाणे अंमलदार असतील,

पंढरपूर, सांगोला तालुक्यातील सदस्य ए.एन.बचुटे, लेखापरीक्षक श्रेणी-१ अधिन विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सह. सहकारी संस्था (साखर).

माळशिरस, माढा तालुक्यातील सदस्य ए.एस. म्याकलवार, उपलेखापरीक्षक अधिन विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (साखर).

बार्शी, करमाळा तालुक्यातील सदस्य एन.बी. ठोकळ, लेखापरीक्षक श्रेणी-१ अधिन द्वितीय विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (साखर).

मोहोळ, मंगळवेढा तालुक्यातील सदस्य मोरे, लेखापरीक्षक श्रेणी-२ अधिन द्वितीय विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (साखर).

उ. सोलापूर, द. सोलापूर तालुक्यातील सदस्य हे एस. आर.आडम, लेखापरीक्षक श्रेणी-१ अधिन तृतीय विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (साखर).

अक्कलकोट तालुक्यातील सदस्य हे डी. के. मुदाळे, लेखापरीक्षक श्रेणी-२ अधिन तृतीय लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (साखर) सोलापूर.

सदस्य शेतकरी प्रतिनिधी, यांची नियुक्ती तहसिलदार यांनी करावी.

सदर भरारी पथकांची कार्यप्रणाली खालीलप्रमाणे राहील.

भरारी पथकातील सदस्यांची नांचे व संपर्क क्रमांक कार्यक्षेत्रातील साखर कारखाने व शेतकरी यांना उपलब्ध होतील अशा प्रकारे प्रसिद्ध करण्यात यावीत.

जिल्हयातील भरारी पथकांनी स्वयंस्फुतीर्ने कारखानास्थळावर अचानक भेटी देऊन वजनकाट्यांची तपासणी करावी. जेणेकरुन ऊसाचे वजना संदर्भात प्राप्त होणाऱ्या तक्रारीवर आळा बसेल.

शेतकऱ्यांना वजनाची पावती योग्य प्रकारे देण्यात येते किंवा कसे याची खात्री करणे.

एखादया साखर कारखान्याच्या बाबतीत ऊसाचे वजनाबाबत गैरप्रकार होत असल्याची तक्रार यंत्रणेस किंवा पोलीसांकडे प्राप्त झाल्यावर लगेच त्या साखर कारखान्याचे वजनकाट्याची तपासणी करावी आणि गैरप्रकार आढळल्यास यंत्रणेमार्फत योग्य ती कायदेशीर कारवाई करावी.

वजनकाट्याच्या तपासणीमध्ये काही गैर कायदेशीर बाबी आढळल्यास सर्व संबंधितावर कायदेशीर कारवाई करावी.

ऊस वजन काटा कॅलिब्रेशन मध्ये फेरफार करुन ऊस वजन काटामारी केली जाते अशा तक्रारी प्राप्त होत आहे. यासाठी ऊस वजनकाटा कॅलिब्रेशन करुन सील करणे आवश्यक आहे. संबंधित वैधमापन अधिकाऱ्याने वजनकाट्याची तपासणी करतेवेळी शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींना सोबत घेऊन ऊस वजन काटे कॅलिब्रेशन झालेनंतर सील करावेत, अशा सूचनाही जल्हि।धकिारी यांनी दल्यिा आहेत.

साखर कारखान्यांच्या वजनकाटे तपासणी संदर्भात भरारी पथकांमध्ये सुयोग्य अशा शेतकरी प्रतिनिधीचा समावेश तहसिलदार यांनी करावा. तहसिलदार यांनी भरारी पथकातील सदस्यांचे नांव व संपर्क क्रमांक सदर कार्यक्षेत्रातील साखर कारखाना व शेतकरी यांना उपलब्ध होईल अशा प्रकारे प्रसिद्ध करावेत. तसेच तालुकानिहाय पथकाचे नांव व संपर्क क्रमांक या कार्यालयास अवगत करावेत.

भरारी पथकांनी केलेल्या कार्यवाहीबाबत दर पंधरवड्यास अहवाल सादर करावा. सदरचा आदेश हा सोलापूर जिल्ह्याचे हद्दीत लागू राहील, असे पत्रकात नमूद आहे.

# कृषी विद्यापीठांनी पारंपरिक देशी बियाण्यांचे उन्नतीकरण करावे- राज्यपाल देवव्रत

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** जागतिक हवामानाचे गंभीर संकट लक्षात घेऊन राज्यातील कृषी विद्यापीठांनी पारंपरिक देशी बियाणांना संस्कारित करून त्यांचे उन्नतीकरण करावे. प्रतिकूल परिस्थितीमध्ये देखील शेतकऱ्यांना उत्पन्न मिळेल अशा प्रकारचे बियाणे निर्माण करावीत असे सांगताना कृषी विद्यापीठांनी राज्यात नैसर्गिक शेतीची क्रांती आणण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन राज्यपाल तथा राज्यातील विद्यापीठांचे कुलपती आचार्य देवव्रत यांनी केले.

लोकभवन मुंबई येथून कृषि विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच राज्यातील कृषी व पशुविज्ञान विद्यापीठांच्या कुलगुरूंशी दृकश्राव्य माध्यमातून संवाद साधताना राज्यपाल



बोलत होते.

बैठकीला कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, 'पोकरा'चे प्रकल्प संचालक परिमल सिंह, राज्यातील कृषी तसेच पशुविज्ञान विद्यापीठांचे कुलगुरु, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, 'आत्मा'चे संचालक सुनील बोरकर व कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

संकरीत बियाणे शेतकऱ्यांसाठी संकट असून ते महाग देखील आहे. त्यांचा वापर केल्यास रासायनिक खते देखील जास्त लागतात. उत्पादित अन्नधान्याला चव नसते व त्याचे पोषणमूल्य देखील कमी असते. त्यामुळे कृषी विद्यापीठांनी पारंपरिक बियाण्यांवर संशोधन करुन त्याचे उन्नतीकरण करावे, असे राज्यपालांनी सांगितले.

सर्व कृषी विज्ञान केंद्रांनी नैसर्गिक शेतीच्या प्रचार प्रसारासाठी 'मॉडेल फार्म' विकसित करावे व शेतकऱ्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करावी असे राज्यपालांनी सांगितले. नैसर्गिक शेती ही लोकचळवळ झाली पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

# डिजिटल अरेस्ट' आणि 'ओटीपी' स्कॅमपासून सावधान!

## सोलापूर सायबर सेलचे नागरिकांना आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ऑनलाइन व्यवहारांच्या वाढत्या व्यापासोबतच सायबर भामट्यांच्या जाळ्यापासून नागरिकांना वाचवण्यासाठी सोलापूर सायबर क्राईम सेल आणि बजाज फायनान्स लिमिटेड सरसावले आहेत. देशातील १०० शहरांमध्ये राबविल्या जाणाऱ्या सायबर सुरक्षा उपक्रमाचा एक भाग म्हणून सोलापुरात 'नॉकआउट डिजिटल फ्रॉड' ही जनजागृती मोहीम राबवण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सत्यजीत शाह, सायबर क्राईम अधिकारी प्रांजली काळे, अश्विनी लोणी, सेवानिवृत्त एसीपी सुरेश घाडगे आणि बजाज



फायनान्सचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स येथे आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थी आणि प्राध्यापकांना संबोधित करताना, सोलापूर सायबर क्राईमचे पी.आय. श्री. श्रीशैल गजा यांनी सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या प्रमाणावर चिंता व्यक्त केली. ते म्हणाले, "बहुतेक सायबर घोटाळे हे तंत्रज्ञानाच्या ज्ञानाचा अभाव आणि जलद नफा मिळवण्याच्या लोभामुळे होतात. बनावट नोकरीच्या ऑफर, मोफत सुट्ट्यांच्या सहली आणि भेटवस्तूंच्या अमिषाला बळी पडू नका."

कार्यक्रमात वक्त्यांनी सध्या प्रचलित असलेल्या विविध फसवणुकीच्या प्रकारांची माहिती दिली. यात प्रामुख्याने डिजिटल अरेस्ट, पोलीस किंवा तपास यंत्रणेचे नाव सांगून भीती दाखवणे, बनावट ओटीपी स्कॅम, बँकेचे अधिकारी असल्याचे भासवून ओटीपी विचारणे,

सोशल मीडिया स्कॅम, कंपन्यांच्या नावाशी साधर्म्य असलेल्या बनावट वेबसाईट आणि व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप्सद्वारे गुंतवणूक करण्यास भाग पाडणे अशा फसवणुकीचा समावेश आहे.

हा उपक्रम भारतीय रिझर्व्ह बँकेच्या २०२४ च्या 'फसवणूक जोखीम व्यवस्थापन' मार्गदर्शक तत्त्वांनुसार राबवला जात आहे. बजाज फायनान्सच्या प्रवक्त्यांनी सांगितले की, ग्राहकांची आर्थिक सुरक्षा हीच आमची प्राथमिकता असून, संशयास्पद लिंक्स, क्यूआर कोड्स आणि अनोळखी अ‍ॅप्सपासून दूर राहणे हेच सुरक्षिततेचे मुख्य सूत्र आहे.

महत्त्वाची टीपः जर तुमची किंवा तुमच्या ओळखीच्या कोणाची सायबर फसवणूक झाली, तर वेळ न घालवता तात्काळ सायबर क्राईम हेल्पलाइन क्रमांक १९३० वर तक्रार नोंदवा.

## संपादकीय

# संघटन उभी राहिली, पण कार्यकर्ता विसरला गेला

**२०१४** मध्ये भाजप सत्तेवर आली, तेव्हा पक्षाने केवळ निवडणुका जिंकण्यावर नाही तर संघटना विस्तारावर भर दिला. या प्रक्रियेत राजकारणात यायची इच्छा असलेले, पण आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि काँग्रेस, राष्ट्रवादी वा शिवसेनेत संधी न मिळालेले अनेक चेहरे हेरले गेले. त्यांना पदे देण्यात आली, बैठकींना बोलावले गेले, कार्यक्रमांची जबाबदारी दिली गेली. त्यामुळे या कार्यकर्त्यांच्या मनात पक्षाबद्दल आदर निर्माण झाला आणि त्यांनी पक्षासाठी झपाटल्यासारखे काम सुरू केले. या काळात ‘भाजप वेगळा आहे’, ‘इथे कार्यकत्यार्ला मान–सन्मान आहे’ अशी भावना खोलवर रुजली. अनेकांना वाटू लागले की मेहनत केली तर पुढे नगरसेवक, आमदार होण्याची संधी मिळेल. संघटन वाढली, रस्त्यावरची गर्दी वाढली, पण या सगळ्याला अंधभक्तीची झालरही लागली, हे वास्तव नाकारता येणार नाही. मात्र आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तोंडावर चित्र पूर्णपणे बदलले आहे. ज्या गोरगरीब, निष्ठावान कार्यकर्त्यांनी वर्षानुवर्षे पक्षासाठी धावपळ केली, त्यांना बाजूला सारून काँग्रेस, राष्ट्रवादीमधून आलेल्या जुन्या, प्रस्थापित नगरसेवकांना तिकीटे दिली जात असल्याचे चित्र दिसते आहे.

यामुळे अनेक कार्यकर्त्यांचा भ्रमनिरास झाला आहे. कोणी भावनिक प्रतिक्रिया देत टोकाची भाषा वापरत आहे, तर कोणी पक्षाच्या नेत्यांशी संपर्क न झाल्याने अस्वस्थ झाले आहे. ही परिस्थिती दुर्दैवी आहे आणि राजकीय पक्षांमधील अंतर्गत लोकशाहीच्या अभावाचे तीव्र दर्शन घडवते.प्रश्न असा आहे की राजकीय पक्षांसाठी कार्यकर्ता हा केवळ निवडणुकीपुरता उपयोगाचा साधन आहे का? की निर्णयप्रक्रियेत सहभागी होणारा खरा भागीदार? सत्ता आणि संख्याबळ मिळाल्यानंतर जर पक्ष जुनेच समीकरणे, जुन्याच चेहऱ्यांवर अवलंबून राहणार असेल, तर ‘संघटना पक्षाची खरी ताकद आहे’ हे घोषवाक्य केवळ पोस्टरपुरतेच उरते.ही बाब फक्त एका पक्षापुरती मर्यादित नाही. सत्ता मिळाल्यानंतर अनेक पक्षांमध्ये हाच पॅटर्न दिसतो— तळागाळात मेहनत करणारा कार्यकर्ता बाजूला आणि निवडणूक जिंकू शकणारा, पैसा व प्रभाव असलेला उमेदवार पुढे. मात्र भाजपने स्वतःला ‘पारंपरिक राजकारणापेक्षा वेगळा’ म्हणून सादर केल्यामुळे अपेक्षा अधिक होत्या आणि त्यामुळे नाराजीही अधिक तीव्र आहे.आज पक्षांतर्गत अस्वस्थता ही केवळ तिकीट न मिळाल्याची नाही, तर मान–सन्मान, सहभाग आणि न्याय्य संधी न मिळाल्याची आहे. या अस्वस्थतेकडे दुर्लक्ष केल्यास त्याचे परिणाम केवळ एका निवडणुकीपुरते मर्यादित राहणार नाहीत. राजकारणात निष्ठा, मेहनत आणि प्रामाणिकपणाला किंमत नसेल, तर उद्या कोणताही कार्यकर्ता मनापासून काम करणार नाही. आणि तेव्हा संघटना कागदावर मजबूत दिसेल, पण जमिनीवर पोकळ ठरेल.ही वेळ आहे आत्मपरीक्षणाची फक्त कार्यकर्त्यांसाठी नाही, तर सत्तेत असलेल्या सर्व राजकीय पक्षांसाठी. कारण लोकशाही केवळ निवडणूक जिंकण्याने मजबूत होत नाही, ती टिकते कार्यकर्त्यांच्या विश्वासावर.

## प्रबोधन

# शतकात एक । सावित्री जन्मते

**३** जानेवारी हा ज्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्मदिवस आहे, त्या आपले पती क्रांतिबा जोतिरावांसारख्याच समाजकल्याणासाठी काट्याकुट्यांनी भरलेल्या मार्गावरून आयुष्याच्या अखेरपर्यंत चालत राहिल्या. शेवटीसुद्धा संसर्गजन्य प्लेगच्या रोग्याला दवाखान्यात नेण्याच्या मानवतावादी धडपडीत प्लेगचा संसर्ग बाधून त्यांचा मृत्यू झाला. पण त्यांचं हे बलिदान अमर झालं.

मराठीच्या आधुनिक कवितेचा प्रारंभ इ.स. १८५५मध्ये ज्यांच्या काव्यफुले या कवितासंग्रहाने झाला. त्या आद्य कवयित्रीच्या सावित्रीबाईंच्या नावे कवितेचा इतिहास न लिहिण्याची चूक मराठी वाङ्मयाच्या इतिहासकारांनी केली असली, तरी संशोधनापुढे त्यांना नतमस्तक व्हावंच लागेल. शिक्षणक्षेत्रात आद्य शिक्षिका असा सावित्रीबाईंचा गौरवपूर्ण उल्लेख करणारे आणि आपल्या शिक्षणसंस्थेला त्यांचं नाव देऊन त्यांचं चिरंतन स्मारक करणारे कृतज्ञबुद्धीचे शिक्षण संचालक महाराष्ट्रात विपुल संख्येने आढळतात. आज महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाचं कार्य सावित्रीबाईंच्या नावाने करणाऱ्या शिक्षणसंस्था ह्या समाजाने त्यांना कृतज्ञतापूर्वक अर्पण केलेली आदरांजलीच आहे.

थोर सावित्रीबाई या क्रांतिबा जोतीरावांच्या खऱ्या अर्थाने सहधर्मचारिणी होत्या. कारण सावित्रीबाईंनी समाजजागृती, समाजसेवा, अनाथसंगोपन, शिक्षण प्रसार, प्रबोधनपर साहित्यनिर्मिती, विधवा आणि परित्यक्त्यांचं दुःखनिवारण, या जोतीरावांच्या कायार्ची धुरा आमरण सांभाळली. सत्यशोधक समाजाचं कार्य आणि संघटन जोपासण्याचा आणि वाढवण्याचा उपक्रम ज्या निर्भयपणे, धडाडीने या शूर स्त्रीने राबवला, त्याला इतिहासात तोड नाही. १८९३मध्ये पुरंदर तालुक्यातील सासवड येथे सत्यशोधक समाजाच्या विसाव्या परिषदेतील सावित्रीबाईंचं भाषण लक्षात घेण्यासारखं क्रांतिकारक होतं. सावित्रीबाई म्हणाल्या, 'अरे, तुम्ही पळीपंचपात्राच्या आवाजात पंचाग का गाता? महार–मांगाना अस्पृश्य का समजता ? शूद्रादी अतिशूद्रांना अडाणी का ठेवता? तुमच्या या मूर्ख वागण्याने तुमचे जातभाई ब्राह्मण हे खिस्ती होत आहेत. मूखानी, तुम्ही स्वतःला हिंदू म्हणवून घेता, अस्पृश्य हिंदू असताना त्यांना हीन लेखून दूर का ठेवता?

गोरे लोक हिंदू नसताना त्यांच्या शेजारी बसून पावरोटी मटामटा खाण्यात भूषण मानता आणि महार–मांगाची सावली पडली तर विटाळ झाला, असं तुम्ही मानता. हे खऱ्या धमार्चं ज्ञान आहे, असं म्हणता येत नाही. यासाठी ब्राह्मणाने खऱ्या धमार्चं ज्ञान घ्यावं. ते ज्ञान तुम्हास जोतिबा पटवून देईल!' तात्पर्य, महात्मा फुले यांचा वैचारिक वारसा त्यांनी न डगमगता पुढे चालवला.

मानवताप्रेम हा जसा जोतीरावांच्या स्वभावाचा स्थायिभाव होता; तसाच तो सावित्रीबाईंच्याही स्वभावाचा होता. म्हणून तर विधवांच्या केशवपनाला विरोध करण्यासाठी पुण्यातील न्हाव्यांना, या निंद्य कामाच्या विरोधात ठामपणे उभं राहाण्यास त्यांनी धैर्य दिलं. भारतातील हा पहिला सत्याग्रह असावा! स्त्रीनिंदकाला जोतीराव म्हणाले, स्त्रीपासुनि उपजुनिया त्यांची जातच निंदशील जरी । उपटावे कान तुझे त्वन्मातेनेच व्यर्थ इतर करी ॥ तर सावित्रीबाई, स्त्रियांचा उपभोग घेऊन त्यांना लाथाडणाऱ्या पुरुषी प्रवृत्तीवर टीका करताना म्हणतात, चव घेऊनि करी दूर ती । तिजकडे ते जरा न पाही । तिला टाकूनी दुसरीकडे । जावयास त्या लाजही नाही। रीत जगाची उच्छृंखल ही ॥ स्त्रियांच्या शोषणाच्या एका प्रकाराची ओळख घडवताना त्या म्हणतात, 'बाईल काम करीत राही । ऐतोबा हा खात राही । पशूपक्ष्यांत ऐसे नाही। तयास मानव म्हणावे का? ॥

आधुनिक मराठी कवितेच्या ह्या आद्य कवयित्रीने केलेला साहित्यसंचार त्यांच्या प्रतिभाशाली मनाची वेगळी उंची दाखवून देतो. सावित्रीबाईंनी काव्यफुले हा कवितासंग्रह १८५४मध्ये निर्माण केला. जोतिबांची भाषणं १८५६मध्ये त्यांनी संपादित केली. सावित्रीबाईंची जोतिबास पत्रे हे तिसरं पुस्तक. सावित्रीबाईंची भाषणे' हा विविध विषयांवरील या पुस्तकात एकूण ३ पत्रं आहेत. 'मातुश्री भाषणांचा १८९२मध्ये प्रकाशित झालेला संग्रह शास्त्री नारो आबाजी महाघट पानसरे पाटील यांनी प्रकाशित केला आहे. सावित्रीबाईंचा दुसरा कविता संग्रह बावनकशी सुबोध रत्नाकर अशा शीर्षकाचा असून तो देशाचा काव्यरूप इतिहास व जोतीरावांच्या कायार्चं वर्णन करणारा ५२ सलग रचनांचा आहे.

तात्पर्य, क्रांतिज्योती सावित्रीबाई ह्या केवळ क्रांतिज्योतीचे नव्हे, तर सेवाज्योती, दयाज्योती, चिंतनज्योती, साहित्यज्योतीही आहेत.

सत्यशोधक पंढरीनाथ पाटील सावित्रीबाईंची थोरवी वर्णन करताना म्हणतात, 'सावित्रीबाईंच्या भारतीय स्त्रीच्या उत्थानासाठी केलेल्या सहृदयी कायार्शी तुलना करता येणारं एकही उदाहरण १९व्या शतकात सापडत नाही.' डॉ. बाबा आढाव सावित्रीबाईंचं असाधारणत्व वर्णन करताना म्हणतात, 'सावित्रीबाईंचं संपूर्ण जीवन क्रांतिकारक आहे.' या आद्य शिक्षिकेला कोटी कोटी प्रणाम करताना म्हणू या–

शतकात एक । सावित्री जन्मते
पतिकार्थी होते। एकरूप ॥१
सूर्य ज्योतिबांची । प्रभा क्रांतिज्योती
अज्ञान धाडती । दिगंतरा ॥२
आईबाप दोघे । दीन–दुबळ्यांचे
समाजोद्धाराचे । व्रत घेती ॥३
अनाथ बाळांचे । संगोपन केले
पोटाशी धरिले । धन्य माता ॥४
विधवांना दिला । मायेचा आधार
भेटले माहेर । ममतेचे ॥५
समाजाच्या नेत्री । अंजन घातले
अंधत्वाला दिले। पिटाळून ॥६
पृथ्वीच्या मोलाचा । तिचा सेवाभाव
दुःख तेथे ठाव । सावित्रीचा ॥७
दुबळ्यांची चिंता । करी महामाता
सावित्रीच्या चित्ता । व्यथा त्यांची ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर–416012
92258 09071

## प्रबोधन

# माता सावित्रीला । करू या वंदन

**शि**क्षणातील गळती थांबवण्यासाठी गरीब विद्यार्थ्यांना पगार देण्याची क्रांतिकारी व्यवस्था महाराष्ट्रात सर्वप्रथम कोणी केली? कमवा आणि शिका ह्या स्वावलंबी शिक्षणाचा प्रारंभ कोणी केला? बऱ्याच सुशिक्षितांना या प्रश्नांची योग्य उत्तरं पटकन सुचणार नाहीत. पण शिक्षण क्षेत्राला या मूलभूत सुधारणा आवश्यक आहेत, याची जाणीव करून दिली एका थोर दांपत्याने– क्रांतिबा जोतीराव आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई यांनी. शूद्रातिशूद्रांसाठी मुलींची शाळा काढणे, महाराष्ट्रात रात्रशाळेची पहिल्यांदा स्थापना करणे, अशा नव्या शैक्षणिक आघाड्या उघडून नव्या प्रबुद्ध महाराष्ट्राला जन्म देणारे जोतिराव हे महाराष्ट्रपिता आहेत आणि महाराष्ट्रमाता आहेत, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले.

म्हणूनच एका कवीने सावित्रीस्तवन कवितेत, जोतिबांची जणू शक्ती तू, नारी महनीया । क्रांतिज्योती सावित्री तू, प्रातः स्मरणिया । असा त्यांचा मोठेपणा शब्दबद्ध केला आहे. महात्मा जोतिरावांच्या सुधारणावादी, पुरोगामी कल्पना वास्तवात सावित्रीबाईंनी आणल्या. महात्मा फुले यांच्या बालहत्या प्रतिबंधक गृहाची काळजी सावित्रीबाई घेत असत. वाट चुकलेल्या विधवा स्त्रियांची बाळंतपणं करून मृत्यूच्या दाढेतून त्यांना मातृहृदयी सावित्रीबाई ओढून काढीत असत. निरपेक्ष सेवेचं सावित्रीबाईंसारखं दुसरं उदात्त उदाहरण महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात शोधूनही सापडणार नाही.


क्रांतिज्योती सावित्रीबाई केवळ थोर मातृहृदयाच्याच नव्हे; तर त्या थोर कवीमनाच्याही होत्या. मराठी कवितेच्या आद्य जननी असा त्यांचा गौरव केला जातो. कारण कविवर्य केशवसुतांच्या आधी तीस वर्ष सन १८५४मध्ये त्यांचा काव्यफुले हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला, तेव्हा त्या तेवीस वर्षांच्या होत्या. अभ्यास साधनांचा अभाव असतानासुद्धा त्यांनी काव्यविषयक कविता, आत्मपर कविता, निसर्गवर्णनपर कविता, सामाजिक कविता, बोधपर प्रार्थनापर कविता, आणि स्फुटकविता असे अनेक विषय हाताळून त्यांनी जी क्रांती केली, ती आश्चर्यजनक आहे. काव्यनिर्मिती– वरील त्यांचा अधिकार स्पष्ट करणारी आहे.

सावित्रीबाईंच्या दयार्द्र कवयित्रीमनाला अस्पृश्यांच्या दयनीय स्थितीने व्याकुळ केलं. उच्च संस्कृतीचा टेंभा मिरवणाऱ्या भारतीय समाजाने हजारो वर्षं अस्पृश्यांना नरकयातना समाजाने हजारो वर्ष अस्पृश्यांना नरकयातना देऊन छळलं. अस्पृश्य भावा–बहिणींच्या दुःखाला वाचा फोडण्याचं काम थोर कवयित्री सावित्रीमातेने पहिल्यांदा केलं. शूद्राचे दुखणे या कवितेत शूद्रांच्या दुर्दैवी स्थितीविषयी त्या म्हणतात, दोन हजार वर्षांचे शूद्रा दुखणे लागले। ब्रह्मविहित सेवेचे भू देवांनी पछाडले। अवस्था पाहून त्यांची हाय शब्द मनी उठे। सुलभ मार्ग कोणता काय विचारे बुद्धीही अटे। शूद्रांना सांगण्याजोगा आहे शिक्षण मार्ग हा । शिक्षणाने मनुष्यत्व, पशुत्व हाटते पाहा!

शिक्षण हाच उद्धाराचा एकमेव उपाय आहे, हे सत्य सावित्रीबाईंनी मनोमन जाणलं होतं. विद्येविना मती गेली हा जोतिरावांचा सूत्रबद्ध विचार सर्वविदीत आहे. तोच विचार काव्यबद्ध करून सावित्रीबाईंनी असा मांडला. एकच शत्रू असे आपला काढू पिटून मिळून तयाला । त्याच्याशिवाय शत्रूच नाही। शोधून काढा मनात पाही । सांगते पाहा दुष्ट शत्रूचे। नाव नीट रे एके तयाचे। अज्ञान ।

क्रांतिज्योती सावित्रीबाईंना मराठी अस्मितेची दोन प्रेरणास्थानं आकर्षित करीत होती. पैकी एक होतं युगपुरुष छत्रपती शिवराय आणि दुसरे होते, करवीरराज्य संस्थापिका– संवर्धिका शिवस्नुषा छत्रपती महाराणी ताराराणी. औरंगजेबच्या तावडीतून मराठी मुलूख सोडवला; छत्रपती शिवरायांनी! तर सनातनी पेशव्यांच्या स्वदेशी धाकाला आव्हान दिलं महाराणी ताराराणीने! म्हणून पेशवेधार्जिण्या इतिहासकारांनी ज्या युगस्त्रीचं विकृत चित्रण केलं त्यांना न्याय दिला सावित्रीबाईंनी. 'छत्रपती शिवाजी' कवितेत त्या शिवस्तुती करताना म्हणतात, छत्रपती शिवरायांचे प्रातः स्मरण करावे। शूद्रादि अतिशूद्रांचा प्रभू वंदू मनोभावे । नळराजा, युधिष्ठिर, द्रौपदीही, जनार्दन। पुण्यश्लोक पुराणात इतिहासी शिवानन। छत्रपती ताराराणीचा गौरव करताना, 'कोल्हापूरची जगदंबा म्हणजे ताराराणी, महाराष्ट्राची अंबाबाई म्हणजे छत्रपती ताराराणी असं म्हणून मराठी श्रद्धेला पुराणातून काढून वास्तवभूमीवर आणलं, ते सावित्रीबाईंनी! याला म्हणावा प्रतिभेचा खरा विकास! करवीर राज्य स्थापन केलं ताराराणीने, अंबेने–जगदंबेने नव्हे. सावित्रीबाई लिहितात, छत्रपती सिंहासनीची एक राणी ताराबाई ` कोल्हापूरची जगदंबा महाराष्ट्राची अंबाई। शत्रूवर झाली छाया काळ तयाची ती होई। जेरीस शत्रूला करून करी बेफामी लढाई। स्वत्त्वाची जपणूक करणाऱ्या बुद्धिप्रामाण्यवादी सावित्रीबाईंनी नव्या पिढीला आपला मार्ग निवडण्याचं दिग्दर्शन छान केलं आहे. तेव्हा पक्कं लक्षात ठेवा–

जोतिराव होते। महाराष्ट्रपिता
महाराष्ट्रमाता । सावित्री ही ॥१
नवमहाराष्ट्र । घातले जन्माला
प्रारंभ विद्येला । मग झाला ॥ २
महाराष्ट्र होता । त्याआधी अज्ञानी
होते वर्ण तिन्ही । अज्ञानात ॥ ३
ब्राह्मण्याचे बंड । जोतिबा मोडती
सावित्रीला देती। आधी ज्ञान ॥४
विद्यावंचितांना । पाजी विद्यामृत।
'साऊ' चे मातृत्व। धन्य झाले ॥५
भारतीय नारी । प्रबुद्ध जाहली
थोर क्रांती। केली सावित्रीने ॥६
शिक्षणाची गंगा । नेली शूद्राघरी
युगस्त्री सावित्री । वंदनीय ॥७
माता सावित्रीला । करू या वंदन
अर्पिले जीवन । राष्ट्रोद्धारा ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर–416012
92258 09071

# वेळापूर येथील जि.प. मुलींच्या शाळेस हँडवॉश बेसिन भेट



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** नवीन वर्षाच्या शुभ मुहूर्तावर रोटरी क्लब अकलूज आणि भक्ती कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्यूट अकलूज (बॅच जून २०२५) वतीने, जिल्हा परिषद मुलींची शाळा, वेळापूर, येथील विद्यार्थिनींसाठी उत्तम दर्जाचे हँडवॉश बेसिन भेट स्वरूपात देण्यात आले. या कार्यक्रमा प्रसंगी रोटरी क्लबचे अध्यक्ष केतन बोरावके यांनी "वॉश बेसिनची ही भेट म्हणजे केवळ एक वस्तू नसून स्वच्छता आरोग्य आणि चांगल्या सवयींचा संदेश आहे" असे मत व्यक्त करत, हात धुणे ही छोटी सवय असली तरी, ती आपल्याला आजारांपासून दूर ठेवते. त्यामुळे शाळेत आणि घरी नेहमी हात स्वच्छ धुण्याच्या सवयीमुळे आरोग्य कसे चांगले राहते याचे महत्त्व सांगत, पाण्याचा योग्य वापर तसेच शाळेची संपत्ती जपणे याविषयी मुलींना मार्गदर्शन केले. रोटरी क्लब ही सेवाभावी संस्था असून शिक्षण, आरोग्य व स्वच्छतेसाठी सातत्याने कार्य करत गरजू शाळा व विद्यार्थ्यांना शक्य होईल तेवढे सहकार्य करत असल्याचे त्यांनी सांगितले.

शाळेचे मुख्याध्यापक युन्नुस मुलाणी यांनी प्रास्ताविकातून शाळेचा व विद्यार्थिनींचा विविध क्षेत्रातील यशाचा आढावा सांगत आज नूतन वर्ष २०२६ च्या प्रारंभीच शाळेस रोटरी क्लब अकलूज व भक्ती कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्यूट अकलूज यांच्या सौजन्यातून वॉश बेसिन ची भेट मिळाली हा त्यांचा उपक्रम स्तुत्य आहे असे सांगत विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी त्यांची ही उच्चतम दर्जाची भेटवस्तू महत्त्वाची ठरणार आहे असे सांगितले.

रो. अजिंक्य जाधव व गजानन जवंजाळ यांनी मनोगत व्यक्त केले.

भेट समारंभानंतर उपस्थित सर्व विद्यार्थिनींना रोटरी क्लब व भक्ती कॉम्प्युटर या दोन्ही संस्थेच्या वतीने नवीन वर्षाच्या शुभेच्छा देत खाऊचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी रोटरी क्लबचे अध्यक्ष केतन बोरावके, सचिव अजिंक्य जाधव, रोटरी संचालक राजीव बनकर, प्रकल्प प्रमुख व भक्ती कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्यूट अकलूजचे प्राचार्य गजानन जवंजाळ, भक्ती संस्थेचे विद्यार्थी प्रतिनिधी सुशांत वगरे, अर्चना शिंदे–शेळके, सुचित्रा इंगळे–विभुते, प्रियांका होनमाने जि.प. वेळापूर मुली शाळेचे मुख्याध्यापक युन्नूस तांबोळी, केंद्रप्रमुख बापूसाहेब नाईक नवरे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष करिष्मा मुलाणी, उपाध्यक्ष मनीषा भानवसे, तालुका शिक्षक पसंस्थेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब मगर विद्यार्थीनी व पालक वर्ग उपस्थित होते. सूत्रसंचालन नितीन चव्हाण, आभार प्रदर्शन जीवन रननवरे, प्रवीण कुमार पांगे यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीम. आसराबाई जैन, श्रीम.किरण घाडगे, सौ.कविता आवटे यांनी परिश्रम घेतले.

## वात्रटिका

### मी समाजसेवक

मी जसे भोगले तसे
वारसांना मिळावे सुख...
पण तिकीट मिळाले नाही
म्हणून लय वाढली धाकधूक...
आक्रोश केला ओरड केली
धायमोकलून रडून झाले...
तिकीट कापले पक्षाने आणि
समाजसेवा वृत धुळीस मिळाले...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले : मानवतेची तेजस्वी मशाल

**भा**रतीय समाजाचा इतिहास हा केवळ राजकीय सत्तांतरांचा किंवा युद्धांच्या पराभव–विजयांचा इतिहास नाही, तर तो माणसाने माणसावर लादलेल्या अन्यायकारक सामाजिक रचनेचा आणि त्या रचनेविरुद्ध उभ्या राहिलेल्या मानवी संघर्षाचा दीर्घ इतिहास आहे. या इतिहासात अनेक राजे, योद्धे आणि विचारवंत आढळतात; मात्र ज्यांनी समाजाच्या मुळावरच प्रहार करून माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळवून देण्याचा प्रयत्न केला, अशी व्यक्तिमत्त्वे तुलनेने कमी आहेत. अशा दुर्मीळ, तेजस्वी आणि क्रांतिकारी व्यक्तिमत्त्वांमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. ३ जानेवारी १८३१ रोजी जन्मलेल्या सावित्रीबाई फुले या केवळ भारतातील पहिल्या महिला शिक्षिका नव्हत्या, तर त्या शिक्षण, समता, स्त्रीमुक्ती, दलितोद्धार आणि मानवमूल्यांच्या रक्षणासाठी आयुष्यभर झगडणाऱ्या महान समाजसुधारक होत्या. त्यांच्या जीवनाचा प्रत्येक क्षण हा अन्यायाविरुद्धचा संघर्ष आणि मानवतेच्या बाजूने उभा राहिलेला साक्षात्कार होता.

सावित्रीबाई फुले ज्या सामाजिक वातावरणात जन्माला आल्या, ते वातावरण अत्यंत प्रतिगामी, विषम आणि अमानवी होते. जातिभेद हा समाजव्यवस्थेचा कणा मानला जात होता. जन्मावर आधारित श्रेष्ठ–कनिष्ठतेचे नियम इतके कठोर होते की माणसाच्या आयुष्याची दिशा त्याच्या जन्मानेच ठरवली जात होती. अस्पृश्यतेच्या नावाखाली समाजातील मोठ्या वर्गाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकारच नाकारला गेला होता. स्त्री ही पुरुषाची मालमत्ता समजली जात होती. शिक्षण, स्वातंत्र्य, मतप्रदर्शन आणि निर्णयक्षमता या गोष्टी स्त्रीसाठी निषिद्ध मानल्या जात होत्या. बालविवाह, बहुपत्नीत्व, विधवांचे केशवपन, धार्मिक अंधश्रद्धा, सामाजिक बहिष्कार आणि मानसिक LT या प्रथा समाजमान्य होत्या. अशा परिस्थितीत जन्म घेऊनही सावित्रीबाई फुले यांनी या व्यवस्थेला निमूटपणे स्वीकारले नाही, तर तिच्या विरोधात उभे राहण्याचे अपूर्व धैर्य दाखवले.

महात्मा ज्योतिराव फुले यांच्यासोबतचा सावित्रीबाईंचा जीवनप्रवास हा केवळ पती–पत्नीचा सहवास नव्हता, तर तो विचारसमानतेवर आधारित सामाजिक संघषार्चा सहप्रवास होता. ज्योतिराव फुले यांनी सावित्रीबाईंना शिक्षण दिले आणि समाजपरिवर्तनाची दृष्टी दिली. त्या काळात स्त्रीने शिक्षण घेणे म्हणजे समाजाच्या रूढींना उघड आव्हान देणे होते. शिक्षण घेतल्यानंतर सावित्रीबाईंनी हे स्पष्टपणे ओळखले की शिक्षणाशिवाय समाजातील शूद्र–अतिशूद्र, दलित आणि स्त्रिया कधीही मानसिक गुलामगिरीतून मुक्त होऊ शकणार नाहीत. शिक्षण हे केवळ अक्षरज्ञान नसून ते माणसाला विचारशील, विवेकी आणि स्वाभिमानी बनवते, हा विचार त्यांच्या संपूर्ण कायार्चा पाया ठरला.

१८४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी सुरू झालेली पहिली शाळा ही भारतीय समाजाच्या इतिहासातील एक क्रांतिकारी घटना होती. ही शाळा म्हणजे केवळ शिक्षण देणारी संस्था नव्हती, तर ती



पितृसत्ताक, जातीय आणि स्त्रीद्वेषी व्यवस्थेविरुद्ध उघड केलेले बंड होते. सावित्रीबाई दररोज शाळेत जात असताना त्यांना समाजाच्या तीव्र विरोधाला सामोरे जावे लागत असे. रस्त्यात त्यांच्या अंगावर शेण, चिखल, दगड फेकले जात. त्यांना अपमानास्पद शिव्या दिल्या जात. मात्र या सर्व अपमानांना सामोरे जात असतानाही त्यांनी शिक्षणाचा मार्ग कधीही सोडला नाही. त्यांच्या पिशवीतील अतिरिक्त साडी ही त्यांच्या चिकाटीचे, धैर्याचे आणि मानवतेवरील APXT विश्वासाचे प्रतीक बनली.

सावित्रीबाई फुले यांचे शिक्षणकार्य केवळ उच्चवर्णीय समाजापुरते मर्यादित नव्हते. त्यांनी शूद्र–अतिशूद्र, दलित आणि वंचित समाजातील मुला–मुलींसाठी शाळा सुरू करून शिक्षणावर असलेली जातीय मक्तेदारी मोडून काढली. समाजाच्या तळागाळातील घटकांना शिक्षणाची संधी मिळणे हीच खरी सामाजिक क्रांती आहे, हा विचार त्यांनी कृतीतून सिद्ध केला. शिक्षणामुळे माणूस प्रश्न विचारायला शिकतो, अन्याय ओळखतो आणि स्वतःच्या हक्कांसाठी उभा राहतो, हे त्यांनी समाजासमोर ठामपणे मांडले.

स्त्रियांच्या सामाजिक स्थितीबाबत सावित्रीबाई फुले यांची भूमिका अत्यंत प्रगत, मानवतावादी आणि काळाच्या पुढची होती. त्या काळात स्त्रीला दुय्यम, दुर्बल आणि परावलंबी मानले जात असताना सावित्रीबाईंनी स्त्रीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व, विचारशक्ती आणि आत्मसन्मान असलेला मानव म्हणून पाहिले. स्त्रीशिक्षणाशिवाय समाजाचा सर्वांगीण विकास शक्य नाही, हे त्यांनी आपल्या लेखनातून आणि कायार्तून समाजासमोर मांडले. शिक्षित स्त्री ही केवळ स्वतःचेच नव्हे, तर संपूर्ण कुटुंबाचे आणि पुढील पिढ्यांचे भविष्य घडवते, हा विचार त्यांनी समाजमनात रुजवण्याचा प्रयत्न केला.

विधवांच्या प्रश्नांवर सावित्रीबाई फुले यांनी घेतलेली भूमिका त्यांच्या सामाजिक संवेदनशीलतेचे सर्वोच्च उदाहरण आहे. त्या काळात विधवांचे जीवन अत्यंत अमानवी होते. केशवपन, रंगीत वस्त्रांवर बंदी, धार्मिक बंधने, सामाजिक बहिष्कार आणि मानसिक LT या साऱ्या गोष्टी विधवांच्या नशिबी होत्या. सावित्रीबाईंनी या प्रथांचा तीव्र विरोध केला. त्यांनी विधवांसाठी आश्रयगृहे सुरू केली आणि त्यांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळावा, यासाठी समाजाशी संघर्ष केला. विधवा म्हणजे पापी किंवा समाजावर ओझे नसून तीही एक पूर्ण मानव आहे, हा विचार त्यांनी समाजासमोर ठामपणे मांडला.

विधवांच्या आयुष्यातील सर्वात भीषण समस्या म्हणजे सामाजिक भीतीमुळे होणाऱ्या बालहत्या. अवैध गर्भधारणेमुळे अनेक विधवांना नवजात बालकांचा बळी द्यावा लागत असे. या अमानुष प्रथेविरुद्ध सावित्रीबाई फुले यांनी बालहत्या प्रतिबंधक गृह सुरू केले. येथे विधवांना सुरक्षित वातावरणात प्रसूती करता येत असे. हा उपक्रम म्हणजे केवळ समाजसुधारणा नव्हे, तर तो मानवी करुणेचा आणि मातृत्वाच्या सन्मानाचा सर्वोच्च आविष्कार होता.


अस्पृश्यता निर्मूलनासाठी सावित्रीबाई फुले यांनी उचललेली पावले त्या काळात अत्यंत धाडसी आणि क्रांतिकारी होती. अस्पृश्यांना सार्वजनिक पाणवठ्यांवर पाणी घेण्यास मनाई असताना त्यांनी आपल्या घरातील पाण्याचा हौद सर्वांसाठी खुला केला. ही कृती म्हणजे सामाजिक समतेचा आणि मानवतेचा जाहीरनामा होता. त्यांनी कृतीतून दाखवून दिले की माणसाची ओळख त्याच्या जातीवर नव्हे, तर त्याच्या माणूसपणावर आधारित असली पाहिजे.

सावित्रीबाई फुले या केवळ समाजसुधारक नव्हत्या, तर त्या एक संवेदनशील कवयित्री, लेखिका आणि विचारवंतही होत्या. त्यांच्या ‘काव्यफुले’ या काव्यसंग्रहातून त्यांनी अज्ञानाविरुद्धचा आक्रोश, स्त्रीदुःख, सामाजिक विषमता आणि शिक्षणाचे महत्त्व प्रभावी शब्दांत मांडले. त्यांचे साहित्य हे सामाजिक क्रांतीचे शब्दरूप होते. त्यांच्या कवितांमधून समाजाला आत्मपरीक्षणाची प्रेरणा मिळाली.

१८९७ साली पुण्यात प्लेगची भीषण साथ पसरली असताना सावित्रीबाई फुले यांनी मानवतेचा सर्वोच्च आदर्श घालून दिला. स्वतःच्या जीवाची पर्वा न करता त्यांनी रुग्णांची सेवा केली. एका आजारी मुलाला वाचवताना त्यांना प्लेगची लागण झाली आणि त्यातच त्यांचे निधन झाले. मानवतेसाठी जगणे आणि मानवतेसाठीच प्राण अर्पण करणे हे त्यांच्या जीवनाचे अंतिम सत्य ठरले.

आज सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करताना केवळ औपचारिक कार्यक्रम, भाषणे किंवा प्रतिमा पूजन पुरेसे नाही. त्यांच्या विचारांचा, मूल्यांचा आणि सामाजिक कार्याचा आशय आत्मसात करून तो आजच्या समाजात प्रत्यक्ष कृतीत उतरवणे हीच खरी आदरांजली ठरेल. आजही स्त्रीशिक्षण, लिंगभेद, जातीय विषमता, सामाजिक अन्याय आणि आर्थिक असमानता या समस्या विविध स्वरूपात अस्तित्वात आहेत. अशा वेळी सावित्रीबाई फुले यांचे विचार अधिकच मार्गदर्शक ठरतात.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या केवळ इतिहासातील व्यक्ती नाहीत, तर त्या वर्तमान आणि भविष्याला दिशा देणारी प्रेरणास्रोत आहेत. त्यांनी पेटवलेली शिक्षणाची, समतेची आणि मानवतेची मशाल आजही समाजाला प्रकाश दाखवत आहे. त्या मशालीचा प्रकाश समाजाच्या प्रत्येक कोपऱ्यात पोहोचवणे, हीच त्यांच्या जयंतीनिमित्त खरी मानवंदना ठरेल.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),
ईमेल – bagate.rajendra5@gmail.com

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# प्रत्येक तालुक्याला बुद्धविहार व्हावे : माजी आमदार राजेंद्र राऊत

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** बुद्धांचा विचार हा जगाला शांती, समता व बंधुभावाचा संदेश देणारा असल्याने प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी बुद्धविहार उभारण्यात यावा, अशी भूमिका माजी आ. राजेंद्र राऊत यांनी मांडली.प्रबुद्ध भारत चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने श्रावस्ती बुद्धविहार परिसरात आयोजित धम्म परिषद कार्यक्रमात ते बोलत होते.



यावेळी धर्मानंद कोसंबी विचारपीठावर छत्रपती संभाजीनगर येथील भन्ते करुणानंद महाथेरो, श्रीलंकेचे घंते यश, भन्ते धम्मबोधी थेरो, भन्ते धम्मानंद थेरो, भन्ते शासनसुरी तसेच भिक्खुनी आर्याजी उपस्थित होते.

कार्यक्रमात नूतन नगरसेवक संदेश काकडे यांचा सत्कार करण्यात आला.

राऊत पुढे म्हणाले की, प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी बुद्धविहार उभारण्यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन ही मागणी त्यांच्यापर्यंत पोहोचविणार असून, या उपक्रमासाठी सर्वांनी पाठिंबा द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

महात्मा फुले नगरातील श्रावस्ती बुद्धविहाराच्या प्रांगणात झालेल्या या धम्म परिषदेला नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभला. सभागृहास गोपाळबाबा वलंगकर यांचे नाव देण्यात आले होते, तर विचारपीठाला बौद्ध साहित्याचे अभ्यासक धर्मानंद कोसंबी यांचे नाव देण्यात आले होते.

या धम्म परिषदेसाठी उमरगा, नळदुर्ग, तुळजापूर, धाराशिव, कळंब, परंडा, सोलापूर, कुडुर्वाडी, अकलूज व माळशिरस आदी परिसरातून मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रावस्ती बुद्धविहाराचे मार्गदर्शक भन्ते सुमेध नागसेन यांनी केले. प्रास्ताविक विष्णू कांबळे यांनी मांडले तर आभार प्रा. डॉ. शशिकांत गायकवाड यांनी मानले.

# बार्शी नगरपालिकेकडे १० कोटी ८७ लाख रुपयांचा कर जमा

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** बार्शी नगरपालिका प्रशासनाने घरपट्टी व नळपाणीपट्टी भरण्यासाठी केलेल्या आवाहनाला शहरातील मालमत्ताधारकांनी चांगला प्रतिसाद दिला असून, १ एप्रिल ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत एकूण १० कोटी ८७ लाख रुपयांचा कर नगरपालिकेकडे जमा झाल्याची माहिती कर अधिकारी विठ्ठल पाटोळे यांनी दिली.




घरपट्टी व नळपाणीपट्टी वेळेत भरण्यासाठी नगरपालिका प्रशासनाकडून सातत्याने जनजागृती करण्यात येत होती. मुदत संपल्यानंतर दोन टक्के व्याज आकारले जाणार असल्याने नागरिकांनी कर भरण्यासाठी तत्परता दाखवली. शहरातील मालमत्ताधारकांना ३१ डिसेंबरपर्यंत अंतिम मुदत देण्यात आली होती.

यानुसार १ ते १४ डिसेंबर या कालावधीतच १ कोटी ७८ लाख रुपयांची वसुली झाली. नगरपालिका मुख्याधिकारी तैमूर मुलाणी व कर अधिकारी विठ्ठल पाटोळे यांच्या मार्गदर्शनाखाली कर वसुलीसाठी विशेष मोहीम राबविण्यात आली होती.

विशेष बाब म्हणजे ३१ डिसेंबर रोजी कर भरण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. यावेळी सर्व्हर डाऊन असतानाही कर अधिकारी पाटोळे यांनी नागरिकांशी संवाद साधत पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून दिली, त्यामुळे शेवटच्या दिवशीही कर भरणा सुरळीत पार पडला.

कर वसुलीची प्रक्रिया वेगाने सुरू ठेवण्यासाठी सुट्टीच्या दिवशीही नगरपालिका कार्यालय सुरू ठेवण्यात आले होते. प्रशासनाने केलेल्या योग्य नियोजन व सुविधांमुळेच मुदतीत मोठ्या प्रमाणात कर वसुली शक्य झाल्याचे सांगण्यात येत आहे.

# कोठे यांच्यावर मराठा समाजाचा संताप

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :-** सोलापूर शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे यांनी आपल्या राजकीय स्वाथार्साठी मराठा समाजातील नेत्यांचा सातत्याने वापर केल्याचा गंभीर आरोप मराठा समाजाचे नेते राम भैय्या जाधव यांनी केला आहे. बाळे येथे आयोजित एका राजकीय पक्षाच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी त्यांनी मराठा समाजाने वेळीच सावध राहण्याचे आवाहन केले.



राम भैय्या जाधव म्हणाले की, 'कोठे यांनी यापूर्वी मराठा समाजाचे राजाभाऊ खराडे, त्यानंतर अमोल शिंदे आणि आता पद्माकर काळे यांचा केवळ स्वतःचे राजकारण पुढे नेण्यासाठी वापर केला आहे. गरज संपली की संबंधित व्यक्तींना बाजूला केले जाते. हा प्रकार मराठा समाजासाठी धोक्याचा आहे.'

जाधव यांनी आरोप केला की, मराठा समाजाची संख्या, ताकद आणि भावनिक मुद्द्यांचा उपयोग करून काही नेते स्वतःचे राजकीय हितसंबंध साधतात. मात्र प्रत्यक्षात समाजाच्या प्रश्नांबाबत ठोस भूमिका घेतली जात नाही. 'निवडणुका आल्या की समाजाची आठवण होते आणि काम संपले की समाजाला वाऱ्यावर सोडले जाते,' अशी टीका त्यांनी केली.

सध्याच्या राजकीय घडामोडींमध्ये पद्माकर काळे यांचे नाव पुढे करून पुन्हा एकदा मराठा समाजाची मते एकत्र करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करत जाधव म्हणाले की, 'हा प्रयोग यापूर्वीही झाला आहे. समाजाने इतिहासातून धडा घेतला पाहिजे.'

यावेळी राम भैय्या जाधव यांनी मराठा समाजातील कार्यकर्ते, युवक आणि पदाधिकारी यांनी कोणत्याही एका नेत्याच्या किंवा पक्षाच्या वैयक्तिक अजेंड्याचे साधन बनू नये, असे स्पष्ट केले. 'समाजहित, शिक्षण, रोजगार आणि आरक्षण या मूलभूत प्रश्नांवर ठाम भूमिका घेणाऱ्यांनाच पाठिंबा द्यावा,' असे आवाहन त्यांनी केले. बाळे येथील या बैठकीत स्थानिक कार्यकर्ते, मराठा समाजाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कोठे यांच्याविरोधातील आरोपांमुळे राजकीय वातावरण तापले असून, येत्या काळात याचे पडसाद सोलापूर शहर आणि तालुक्याच्या राजकारणात उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# महाराष्ट्राची मुलींची घोडदौड, गुजरातवर मात

**बेंगलुरू, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्राच्या मुलींनी 44व्या राष्ट्रीय अजिंक्यपद कुमार गट खो-खो स्पर्धेतील विजयी घोडदौड कायम ठेवली आहे.

कर्नाटका खो-खो असोसिएशनच्या वतीने बेंगलुरू शहरातील गुंजर मैदानावर सुरू झालेल्या या स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलींनी गुजरातवर 38-12 अशी एक डाव राखून 26 गुणांनी मात केली. अष्टपैलू कामगिरी करणारे मैथिली पवार (3.40 मिनिटे व 2 गुण) व विद्या तामखेडे (5 मि. व 2 गुण) आणि शानदार सरंक्षण करणारी श्रावणी तामखेडे (2.40 व 1.40 मि.) हे त्यांच्या विजयाचे शिल्पकार ठरले. गुजरातच्या यू. बराई (2.30 मि.) व कोचाडिया (1.00 व 2 गुण) यांचे प्रयत्न अपुरे पडले.



### कोल्हापूरचा जम्मू कश्मीरवर धुव्वा

राष्ट्रीय स्पर्धेत कोल्हापूर व विदर्भचेही संघ स्वतंत्र सहभागी होत असतात. कोल्हापूरच्या मुलींनी जम्मू काश्मीरचा एक डाव राखून 47 गुणांनी धुव्वा उडविला. यात भक्तीने 2.20 मिनिटे पळती करीत आक्रमणात 6 गुण मिळविले. चैत्रालीने संरक्षणात 1 व 5 मिनिटे व तर श्रावणी पाटीलने 4 मिनिटे पळतीचा खेळ केला.

### विदर्भच्या दोन्ही संघाची आगेकूच

विदर्भच्या कुमार व मुली दोन्ही संघानी विजय मिळवित आगेकूच केली आहे. सूजल खांडेकर (1,1,40 मि. व 2 गुण), मोहित नेवरे ( 3.30 मि. व 2 गुण) व स्मीत कापसे (2.30 मि.) यांच्या बहारदार खेळीमुळे विदर्भच्या कुमारांनी मध्यप्रदेशला 13 गुण व 1 डाव राखून सहज नमविले. मध्यप्रदेशच्या हर्षित विश्वकर्मा (1 मि.) व सागर कुटस्ते (4 गुण) यांचे प्रयत्न अपुरे पडले. विदर्भच्या मुलींनी चंदीगडवर 26 गुण व एका डावाने दणदणीत विजय मिळविला. यात श्रध्दा (4.20 मि. व 6 गुण), कोमल (4.40 मि. व 2 गुण) यांनी अष्टपैलू खेळी केली. धनश्रीने 4 गुण मिळवित आक्रमणात साथ दिली. चंदीगडच्या महिमाने (1मि. व 2 गुण) हिने एकाकी लढत दिली.

# ज्येष्ठांसाठी तीन दिवसीय कार्यशाळेचे यशस्वी आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय (भारत सरकार यांच्या उपक्रमांतर्गत सामाजिक परिवर्तन अध्ययन केंद्र (CSSC) तथा प्रादेशिक संसाधन आणि प्रशिक्षण केंद्र (RRTC)मुंबई व सोलापूतील ज्येष्ठ नागरिक संघांची शिखर समिती यांचे संयुक्त विद्यमाने 26, 27, 28 डिसेंबर 2025 असे तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.



पहिल्या दिवशी, आदित्य नगर सांस्कृतिक सभागृह विजापूर रोड, येथे 'ज्येष्ठ नागरिकांचे आहार व पोषण'

या विषयावर पार पडलेल्या कार्यशाळेसाठी आहारतज्ञ तस्लिम चौधरी, देविका डोंगरेकर आदी तज्ञांनी मार्गदर्शन केले.

दुसऱ्या दिवशी, दमाणी ब्लड बँक डफरिन चौक, येथे 'डिजिटल साक्षरता' विषयावर सायबर क्राईमचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीशैल गजा, प्रा. डॉ. प्रसन्न माधवराव गव्हाणे, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे, शिल्प निदेशक संगणक ऑपरेटर आणि प्रोग्रामिंग सहाय्यक विजय भांगे, संगणक अभियंता- सायबर तज्ञ अविनाश पाटील, कॉन्स्टेबल अश्विनी लोणी. इ. मान्यवरांनी मार्गदर्शन केले. तर रविवार दि. 28 डिसेंबर 2025 रोजीच्या अखेरच्या कर्णिक नगर - एकता नगर येथील सत्रात ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. सुरेश गायकवाड, मानसोपचार तज्ञ डॉ. निहार दिलीप बुर्ट, समाजसेविका डॉ. अपर्णा सुभाष कल्याणकर या मान्यवरांनी 'ज्येष्ठ नागरिकांचे मानसिक आरोग्य आणि मालमतेचे संरक्षण' या विषयावर सखोल माहिती दिली.

कार्यशाळा समारोपाच्या या शेवटच्या दिवशी सक्रिय योगदान देणाऱ्या ज्येष्ठांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यात पाच जणांना ज्येष्ठ नागरिक जीवन गौरव व पाच जणांना ज्येष्ठ नागरिक विशेष सन्मान पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यांची नावे.. सौ.सुलभा दातार, मरगू जाधव, निलकंठप्पा कोनापुरे, जयकुमार काटवे, मन्मथ कोनापुरे, शंकरराव करजगी, गुरुलिंग कन्नूरकर, सिध्दाराम गोविंदे, दत्ता निवृत्ती भोसले,कृष्णात देवकर यांचा समावेश आहे.

सदर कार्यशाळेस भरभरून प्रतिसाद मिळाला.

शिबिरातून बरीच अत्यावश्यक माहिती उपलब्ध झाली असल्याच्या प्रतिक्रिया सहभागी ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केल्या.

पहिल्या दिवशीच्या सत्राचे प्रास्तविक शिखर समितीचे अध्यक्ष प्रा. विलास मोरे यांनी, दुसऱ्या दिवशी मुख्य समन्वयक गुरुलिंग कन्नुरकर यांनी तर तिसऱ्या दिवशीचे कोषाध्यक्ष प्रा. कृष्णात देवकर यांनी, तसेच मान्यवरांचे स्वागत शिखर समितीचे सचिव मन्मथ कोनापुरे, बाळासाहेब पाटील व चन्नय्या स्वामी यांनी केले त्याचप्रमाणे प्रत्येक दिवशीच्या कार्यक्रमाची पार्श्वभूमी आणि उद्दिष्ट्ये प्रकल्प समन्वयिका निलिमा येतकर यांनी विषद केली.

कार्यक्रमाचे नेटके नियोजन आणि ज्येष्ठांचा उदंड प्रतिसाद यामुळे ही कार्यशाळा कमालीची यशस्वी ठरली.

# भाजपकडून डावलल्याचा आरोप; मारवाडी समाज संतप्त

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भाजपकडून मारवाडी समाजाला पुन्हा एकदा उमेदवारी न दिल्याने समाजामध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून, याबाबत पुढील दिशा ठरविण्यासाठी समाजाची लवकरच बैठक घेण्यात येणार असल्याची माहिती शहर भाजपचे उपाध्यक्ष श्रीनिवास दायमा यांनी पत्रकार परिषदेत दिली. राजस्थानी (मारवाडी) समाज हा सुरुवातीपासून राष्ट्रवादी विचारसरणीचा व हिंदुत्ववादी पक्ष म्हणून भाजपसोबत ठामपणे उभा राहिलेला आहे. राज्य व केंद्रात भाजपची सत्ता असतानाही यंदाच्या महापालिका निवडणुकीत मारवाडी समाजाला प्रतिनिधित्व देण्यात यावे, अशी आग्रही मागणी सकल मारवाडी समाजातर्फे करण्यात आली होती. यासंदर्भात आमदार विजयकुमार देशमुख, शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांच्यासह इतर मान्यवरांना निवेदन देण्यात आले होते.मागील वीस वर्षांपासून प्रत्येक निवडणुकीत समाजाला केवळ आश्वासने दिली गेली. मागील निवडणुकीत पुढील वेळी समाजाला न्याय दिला जाईल, असे वचन देण्यात आले होते. मात्र यंदाही समाजाला डावलण्यात आल्याने सकल राजस्थानी समाजात तीव्र असंतोष पसरला आहे.भाजपच्या वाढीसाठी सोलापूर शहरात स्व. गोवर्धनदास भुतडा, स्व. गोपीकिसन भुतडा, स्व. मथुरादास डागा, स्व. श्यामसुंदर तिवाडी, विजय बजाज, बाळमुकुंद झंवर यांसारख्या अनेक निष्ठावंत कार्यकर्त्यांनी मोठे योगदान दिले असल्याचे दायमा यांनी सांगितले. यंदाच्या निवडणुकीसाठी सकल मारवाडी समाज व पक्ष कार्यकर्त्यांची संयुक्त बैठक झाली होती. पक्षाच्या शब्दावर विश्वास ठेवून समाजातील अनेक कार्यकर्त्यांनी प्रभाग क्रमांक १, ३, ४ व ५ मधून निवडणूक लढवण्यासाठी अर्ज भरले होते. मात्र शेवटच्या क्षणापर्यंत इच्छुक उमेदवारांना झुलवत ठेवून तिकीट नाकारण्यात आल्याने त्यांचा तीव्र भ्रमनिरास झाला, असा आरोपही दायमा यांनी केला.या पत्रकार परिषदेला लक्ष्मीकांत दरग, सविता जोशी, रजनी शर्मा यांच्यासह समाजातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# दिव्यांग विशेष शाळांच्या थकीत अनुदानासाठी सुधारित तपासणी सूची - सचिव तुकाराम मुंढे

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** २: राज्यातील दिव्यांगांच्या विशेष शाळा, कार्यशाळा व बालगृहांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन तसेच वेतनेतर थकीत अनुदान अदा करण्यापूर्वी संबंधित रक्कम नियमाप्रमाणे देय आहे की नाही, याची खातरजमा करण्यासाठी सुधारित तपासणी सूची निश्चित करण्यात आली असल्याची माहिती दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी दिली.

सचिव मुंढे म्हणाले, थकीत वेतन व वेतनेतर अनुदानाचे प्रस्ताव शासनाकडे सादर करताना अनेक वेळा आवश्यक कागदपत्रांची कमतरता, अपूर्ण आकडेवारी तसेच थकबाकीची कारणे स्पष्ट नमूद केल्याचे आढळून येत होते.

तसेच सर्व शाळा, कार्यशाळा व बालगृहांचे प्रस्ताव सादर करताना एकसमान पद्धतीचा अभाव दिसून येत होता. या पार्श्वभूमीवर सुधारित व एकसमान तपासणी सूची तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी संस्थांचे वेतन व वेतनेतर अनुदानाचे प्रस्ताव तपासणी सूचीप्रमाणे तपासून आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांच्याकडे सादर करावयाचे आहेत.

**जाहिर समन्स** रे.मु.नं. २८८/२०२३ नि.३२

**मोहोळ येथील मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांच्या न्यायालयात,**

श्रीमती. गंगुबाई राजेंद्र पाटील } **वादी**

**विरुद्ध**

श्री. बळवंत उर्फ बळवंतराव बाबुराव पाटील व इतर
प्रतिवादी नं. ८) नागेश उत्तम रुपनर
रा.प्लॉट नं.४१, रेणुका मंगल कार्यालयाजवळ,गुरुदेव दत्त नगर,भाग-६,जुळे सोलापूर,सोलापूर शहर,
जि. सोलापूर } **प्रतिवादी**

ज्याअर्थी उपरोक्त वादी यांनी तुमच्या विरुध्द सरस निरस मानाने वाटप होवुन पृथक कब्जा मिळणेचा दावा या न्यायालयात दाखल केलेला आहे. सदर दाव्याच्या संदर्भात आपले म्हणणेसाठी दि.२५/०२/२०२६ रोजी मध्यान्ही ११.०० वाजता या न्यायालयात स्वतः अगर वकिलामार्फत हजर होण्यासाठी तुम्हांला बोलाविण्यात येत आहे. आपल्या बचावाच्या पुष्ट्यर्थ तुम्ही ज्यांचा आधार घेवू इच्छिता असे सर्व दस्तऐवज त्या दिवशी रुजू करण्याचा तुम्हांला आदेश देण्यात येत आहे.

सदर समन्स प्रसिध्द होवुनही आपण गैरहजर राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी होवुन निर्णय दिला जाईल याची दखल घ्यावी.हे जाहिर समन्स आजरोजी माझे सहिनिशी व शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे.

ता.०३/०१/२०२६

**लिपिक** (शिक्का) **सहा. अधिक्षक**
**दि. न्यायालय क स्तर,मोहोळ**

**NOTICE**

Notice is hereby given that the share certificates for 1185 (One Thousand One Hundred Eighty Five) equity shares of KIRLOSKAR OIL ENGINES LTD, under Folio No. 0063690,Certificate No 37031 and Distinctive No 149072030 to 149073214 standing in the name(s) of Mr.RAMAYYA RANGAYYA MAMDYAL, have been lost or misplaced and undersigned has/have applied to the Company to issue of duplicate share certificate(s) for the said shares. Any person who have claim in respect of the aforesaid shares should lodge claim for the same with the Company at its Registered office: Laxmanrao Kirloskar Road, Khadki, Pune-411003, within 15 days for the date of this notice, else the Company will proceed to issue duplicate share certificate(s)

Name(s) of Shareholder(s)/ Legal Heirs

1. Mr. VIJAY MAMDYAL
2. RAJU MAMDYAL
3. Sushilabai Agayya Mamadyal

Date: 02/01/2026
Place: SOLAPUR

| Folio No | Certificate No | Distinctive No from | Distinctive No to | No of shares |
|---|---|---|---|---|
| 0063690 | 37031 | 149072030 | 149073214 | 1185 |

**ग्रामपंचायत अकोले (खु) ता.माढा जि.सोलापूर**

**टेंडर नोटीस**

ग्रामपंचायत अकोले (खु),ता.माढा,यांचेकडून खालील कामे करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदाराकडून बंद लखोट्यात निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाना रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | मौजे अकोले (खु) येथे नागनाथ नवले ते वाघमारे वस्ती रस्ता करणे. | ४,९९,९६२ | ५००० | २०० | ६ महिने | खुला |
| २) | मौजे अकोले (खु) येथे लिंगायत समाज परिसर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ४,९९,९७६ | ५००० | २०० | ६ महिने | खुला |

टीप: १) कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी दि.०३/०१/२०२६ स. १०.०० पासून २) भरलेल्या निविदा स्वीकारण्याचा दि.०९/०१/२०२६ सायं ५.०० वा पर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय अकोले (खु) ३) निविदा उघडणेचा दि.१०/०१/२०२६ रोजी स. १०.०० वाजता ४) निविदे संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ व २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळेल. ५) निविदा मंजूर,नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा निविदा रद्द करण्याचा अधिकार मा.सरपंच यांना राखुन ठेवला आहे.निविदा फॉर्म सुट्टीचे दिवस वगळून मिळतील व स्वीकारले जातील.

सही/- ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत अकोले (खु),
ता.माढा,जि.सोलापूर

शिक्का

सही/- सरपंच
ग्रामपंचायत अकोले (खु),
ता.माढा,जि.सोलापूर


**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

**-: संपर्क :-**
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) गरजू व्यक्तीस मानपान न पाहता कोणाचीही मदत घेणे उचित असते या अर्थाची म्हण २) टेकडी (हिंदीत) ३) डक उलट लिहा ४) एक आडनाव ५) बाण, तीर ६) एक म्हण-उथळ पाण्याला ***** फार ७) तांदूळ, भात (इंग्रजीत) ९) आजच्या पूर्वीचा गेलेला दिवस ११) परदेस चित्रपटाती अभिनेत्री-*** चौधरी १३) हेराफेरी चित्रपटातील अभिनेता-*** रावल १४) पतीचा भाऊ १६) नाट्य, ड्रामा (मराठीत) १७) शर्ट (ग्रामीण भाषेत) १९) गायीला दिला जाणारा नियमित खुराक २०) नट उलट लिहा २३) बॉडीगार्ड चित्रपटातील अभिनेत्री २६) स्वराज्याची पहिली राजधानी असलेला गड २७) ठाणे लगतचा जिल्हा २९) वांग्यामध्ये मसाला भरून केलेले ३२) वास, गंध ३६) फळातील गोड द्रव ३८) सोळा गुणिले दोन ३९) एक म्हण-दाम करी ** ४१) मार्ग, वाट (हिंदीत) ४२) तीन दुणे ४३) एक (इंग्रजीत) ४४) बारा गुणिले पाच

**आडवे शब्द :** १) भारताचे केंद्रीय नेते-नितीन **** ४) लातूरचे आमदार-अमित **** ७) कोकणातील एक आमदार-नितेश ** ८) पुष्कळ, भरमसाठ ९) बांगड्या विक्रीचा व्यवसाय करणारा १०) तरचा जोडीदार ११) दुधावरील साय १२) स्वभावाने खाष्ट १३) छ. शिवराय या गडावर असताना सिध्दी जोहरने गडाला वेढा टाकला होता १५) कोंढाणा किल्ला घेणारा छ. शिवरायांचा शूर सरदार १८) कापड फाटताना होणारा आवाज २१) पाण्याची लहर २२) दहा वर्षांचा काळ २४) नऊ भागिले तीन २५) पाच आणि सहा मिळून होणारी संख्या २७) तापमान पाहण्यासाठी वापरतात तो धातूचा पातळ चकचकीत घटक २८) घोड्यावर बसल्यानंतर पाय ठेवण्यासाठी असलेली लोखंडी कडी ३०) मवाळच्या विरूध्दार्थी ३१) नाम उलट लिहा ३२) कथेतील पंख असलेली स्त्री ३३) गरम मसाल्यातील एक घटक ३४) घड्याळ (हिंदीत) ३५) नवे कोरे, नवीन कोऱ्या न वापरलेल्या नोटा या अर्थाने ३७) घराच्या पायाभरणीसाठी वापरतात ते दगड, मुरूम इ. मटेरियल ३९) याच्यापासून धागा बनतो ४०) रास उलट लिहा ४२) उन्हाळा (इंग्रजीत) ४३) एक म्हण-काखेत कळसा अन् गावाला *** ४५) अकरा गुणिले तीन ४६) मुलाची पत्नी, स्नुषा

## सुडोकु - 142

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 7 | | | 4 | 2 | 9 | 1 | 5 |
| 1 | 3 | | 5 | | 8 | | 2 | |
| 5 | | 2 | | | | | 8 | 3 |
| 4 | | 3 | | | | 8 | 7 | |
| | 6 | 7 | | | 1 | 3 | | |
| | | | | | | 2 | 5 | |
| | | 4 | 6 | | 5 | | 3 | |
| 6 | | 1 | | | 4 | 5 | | 8 |
| | 8 | | 2 | | | | | 4 |

# वैध उमेदवारांच्या यादीतून अमोल शिंदेंचे नाव गायब

**सोलापूर (कटूसत्य वृत्त)** :- सोलापूर महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रभाग क्रमांक ७ ड (सर्वसाधारण) मतदारसंघातून शिवसेना शिंदे गटाकडून उमेदवारी अर्ज दाखल केलेले जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांचे नाव छाननीनंतर प्रसिद्ध करण्यात आलेल्या वैध उमेदवारांच्या यादीतून वगळण्यात आल्याचे समोर येताच राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली. प्रशासनाच्या या गंभीर चुकीमुळे निवडणूक यंत्रणेची विश्वासार्हताच संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. अमोल शिंदे यांचा उमेदवारी अर्ज छाननी प्रक्रियेत वैध ठरलेला असतानाही, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाकडून जाहीर झालेल्या यादीत त्यांच्या नावाऐवजी नरेश मोहिते यांचे नाव आढळून आले. हा धक्कादायक प्रकार लक्षात येताच अमोल शिंदे यांनी तात्काळ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात धाव घेऊन



जाब विचारला. चौकशीअंती चूक लक्षात आल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक दोन विजया पांगरकर यांनी ही चूक 'प्रिंटिंग मिस्टेक' असल्याचे सांगत दुरुस्त यादी प्रसिद्ध केली.

हा प्रकार समोर येताच शिवसेना शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संताप उसळला. अमोल शिंदे यांच्यासह कार्यकर्त्यांनी निवडणूक कार्यालयात ठिय्या मांडल्याने वातावरण तणावपूर्ण बनले. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात करावा लागला.

या प्रकरणात केवळ शिंदे गटच नव्हे तर विविध पक्षांचे नेतेही अमोल शिंदे यांच्या समर्थनार्थ पुढे आले.

यामध्ये काँग्रेस शहराध्यक्ष चेतन नरोटे, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) शहराध्यक्ष संतोष पवार, प्रदेश चिटणीस आनंद मुस्तारे, शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख प्रा. अजय दासरी, ज्ञानेश्वर सपाटे, अनिकेत पिसे, कुमूद अंकारम यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची भेट घेऊन तीव्र नाराजी व्यक्त केली.

यापूर्वी भाजपच्या एबी फॉर्म खिडकीतून दिलेल्या प्रकरणामुळे निवडणूक कार्यालयात मोठा गोंधळ उडाला होता. त्यानंतर आता थेट वैध उमेदवाराच्या नावाचीच यादीतून गळती झाल्याने, 'ही चूक केवळ अनावधानाने झाली का, की यामागे काही वेगळे हितसंबंध आहेत?'

असा प्रश्न नागरिक आणि राजकीय वर्तुळातून उपस्थित केला जात आहे.

अर्ज स्वीकारण्यापासून छाननीपर्यंत रोज काही ना काही चुका घडत असल्याच्या तक्रारी आधीपासूनच होत्या. मात्र, वैध उमेदवाराचे नावच यादीतून गायब होणे ही अत्यंत गंभीर बाब असून, त्यामुळे संपूर्ण निवडणूक प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

प्रशासनाने तात्काळ दुरुस्ती करून नवी यादी प्रसिद्ध केली असली, तरी 'निवडणूक प्रक्रियेत इतक्या गंभीर चुका कशा आणि का घडत आहेत?' हा प्रश्न आता सोलापूरकरांच्या मनात घर करून बसला आहे.

# टेंभुर्णी येथे सुसज्ज क्रीडा संकुल उभारण्याची मागणी

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त)**:- माढा तालुक्यातील टेंभुर्णी येथील भिमा पाटबंधारे विभागाच्या (कुर्डूवाडी रोड इरिगेशन कॉलनी) जागेवर सुसज्ज क्रीडा संकुल उभारण्यात यावे, अशी मागणी डी.व्ही.पी. बँकेचे चेअरमन औदुंबर (भाऊ) देशमुख यांनी टेंभुर्णी ग्रामपंचायतीकडे निवेदनाद्वारे केली आहे.

टेंभुर्णी शहरामध्ये युवक व विद्यार्थ्यांसाठी सध्या कोणतेही सुसज्ज क्रीडा संकुल उपलब्ध नाही. गावातील अनेक युवक विविध खेळांमध्ये प्राविण्य मिळवत असूनही, योग्य मैदान व क्रीडा सुविधांचा अभाव असल्याने त्यांचा नियमित सराव अडचणीत येत आहे. या पार्श्वभूमीवर नवीन वर्षाची सुरुवात गावाच्या सर्वांगीण विकासासाठी व्हावी, या उद्देशाने औदुंबर देशमुख यांनी ग्रामपंचायतीकडे हे निवेदन सादर केले आहे.

टेंभुर्णी गावात युवकांची संख्या मोठ्या प्रमाणावर असून



कबड्डी, खो-खो, क्रिकेट, व्हॉलीबॉल तसेच इतर मैदानी खेळांविषयी युवकांमध्ये विशेष रुची आहे. सुसज्ज क्रीडा संकुल उपलब्ध झाल्यास युवकांचा सर्वांगीण विकास होईल, त्यांना व्यसनाधीनतेपासून दूर ठेवणे शक्य होईल तसेच आरोग्यदृष्ट्याही लाभ होईल. याशिवाय जिल्हा व राज्यस्तरीय खेळाडू घडवण्याची संधी निर्माण होऊन गावाच्या नावलौकिकात भर पडेल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

भिमा पाटबंधारे विभागाकडे कुडूर्वाडी रोड इरिगेशन कॉलनी परिसरात अंदाजे १५ एकर जागा शिल्लक असून या जागेवर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, उजनी नगर (टेंभुर्णी) यांच्यासाठी आवश्यक इमारत व क्रीडांगण उभारता येऊ शकते. उर्वरित जागेवर टेंभुणीर्तील खेळाडूंसाठी आधुनिक क्रीडा संकुल उभारणे शक्य आहे, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

तसेच सदर जागा सोलापूर-पुणे रोड व कुर्डूवाडी रोड या दोन प्रमुख रस्त्यांच्या लगत असल्याने येथे व्यापारी संकुल उभारण्याची मोठी संधी आहे. टेंभुणीर्तील वाढत्या व्यापारी वगार्साठी दजेर्दार व्यापारी संकुल उभारल्यास ग्रामपंचायतीच्या महसुलातही लक्षणीय वाढ होणार आहे, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

ज्या पद्धतीने सार्वजनिक रुग्णालयासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली, त्याच धर्तीवर क्रीडा संकुल, उजनी नगर शाळा व व्यापारी संकुलासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत दि. २६ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या ग्रामसभेत ठराव मंजूर करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. सदर निवेदन ग्रामविकास अधिकारी, टेंभुर्णी यांना देण्यात आले आहे.

यावेळी डी.व्ही.पी. बँकेचे चेअरमन व माजी अध्यक्ष, माढा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (श.प.) औदुंबर (भाऊ) देशमुख, टेंभुर्णी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव विलास (काका) देशमुख, टेंभुर्णी ग्रामपंचायत सदस्य सुधीर (दादा) पाटील, गणेश खुळे आदी उपस्थित होते.

# परराज्यातील चोरटे अकलूज पोलिसांच्या जाळ्यात

**अकलूज (कटूसत्य वृत्त)**:- संशयीतांचे सीसीटिव्ही फुटेज आणि फुटेज मध्ये चार चाकी वाहनाचा नंबर प्राप्त होताच, अकलूज पोलिसांनी पोलिसी चक्रे फिरवत, चोरी करणारी परराज्यातील टोळीच्या मुसक्या आवळत त्यांना जेरबंद केले.

अकलूज पोलीस ठाण्याकडून मिळालेल्या माहिती नुसार, फियार्दी आनंद हणुमंतराव भोसले रा. यशवंतनगर ता. माळशिरस यांनी, संयुक्तानगर, यशवंतनगर येथील बी. एस. कंस्ट्रक्शनचे ऑफीसचे ड्रॉवर मधील ५,४५,००० रुपये रोख रक्कम ही कोणीतरी, अज्ञात चोरटयाने चोरुन नेली असल्याची फिर्याद दिली. अकलुज पोलीस ठाणे गु.र.नं. ८४७/२०२५ भा.न्या. सं. कलम ३०५ (), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल केली.

सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीचा अकलुज पोलीस ठाणेकडील तपास पथक, पोलीस उपनिरीक्षक विशाल कदम यांचे नेतृत्ताखाली शोध घेऊ लागले. शोध घेत असताना अकलुज पोलीस ठाणेकडील, पोलीसाना घटनेच्या ठिकाणी, काही संशयीताचे सीसीटिव्ही फुटेज प्राप्त झाले होते. सदरचे सीसीटिव्ही फुटेजमध्ये एक चार चाकी वाहनाचा नंबर प्राप्त



झाला तो नंबर व संशयीताचे फुटेज संपुर्ण देशातील पोलीसाचे वेगवेगळ्या व्हॉटसॲप ग्रुपवर पाठविण्यात आलेले होते.

सापुतारा पोलीस ठाणे राज्य गुजरात, यांना देखील सदरचे फुटेज पाठविण्यात आलेले होते. सापुतारा पोलीस ठाणे हददीत नाकांबदी दरम्यान, तीन संशयीत इसम मिळुन आल्याने व सीसीटिव्ही फुटेज मधील वाहन व इमस हे सदर इमसाशी मिळते जुळते असल्याने, सापुतारा पोलीस ठाणे यांनी अकलुज पोलीस ठाणे येथे संशयीता बाबत कळविले.

त्याप्रमाणे त्वरित पोलीस अधिक्षक सोलापुर ग्रामीण, अपर पोलीस अधिक्षक सो. ग्रा. यांचे आदेशान्वये पोसई कदम व तपास पथक सापुतारा येथे रवाना झाले. आरोपी अनिलभाई रेवाभाई भांभोरे वय २७ वर्षे, मिथुनभाई रेवाभाई भांभोरे वय ३४ वर्षे दोघे रा. नाडेलगांव धुळ महोडी फलिया, ता. गरबाडा, जि. दाहोद राज्य गुजरात, वकील तेजसिंग भांभोरे वय ३२ वर्षे रा. अंबाली खजुरीया शिमोडा, फलिया, ता. गरबाडा, जि. दाहोद राज्य गुजरात यांचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने तपास पथकाने तपास केला असता, आरोपीनी सदरचा गुन्हा अकलुज येथे केलेली कबुली दिली.

सदर गुन्हयात चोरी केलेला एकुण ५,४५,०००रु/- रक्कमे पैकी ५,१३, १८० रु/- हस्तगत केली असुन गुन्हा करताना वापरलेले वाहन हुंडाई केटा, कार क्रमांक GJ-20CB-2646 जप्त केलेले आहे.

सदर आरोपीना ताब्यात घेवुन अकलुज पोलीस ठाणे येथे आणुन त्यांची ५ दिवस पोलीस कोठडी न्यायालयाकडुन मंजुर करुन घेत, आरोपीकडे अधिकचा तपास केला असता, यांनी अश्याच प्रकारे सांगोला पोलीस ठाणे हददीत चोरी केल्याची कबुली दिली. त्या गुन्हयात चोरी केलेल्या चांदीचा मुददेमाल देखील आरोपी कडुन जप्त करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हयातील आरोपीनी गुन्हा करताना वापरलेली वाहन हुंडाई केटा कार क्रमांक GJ-20CB-2646, तीन मोबाईल, एक लोखंडी कटावणी, एक काळया रंगाची बॅग, एक लोखंडी पक्कड असे एकुण २०,३६,६८०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी, अकलुज संतोष वाळके, पोलीस निरीक्षक निरज उबाळे यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे प्रकटीकरण शाखा अकलुजचे पोलीस उपनिरीक्षक विशाल कदम व पो. हवा. विक्रम घाटगे, पो. हवा. विनोद साठे, पो. हवा. सुहास क्षिरसागर, पो. हवा. शिवकुमार मदभावी, पो. हवा. आभिजीत कुंभार, पो.कॉ. रणजित जगताप, पो. कॉ. दत्तात्रय खरात, पो.कॉ. सोमनाथ माने, पो.कॉ. पंडीत गवळे तसेच सायबरचे पो. हवा. तांबोळी यांनी कामगिरी केली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विशाल कदम हे करीत आहेत.

# भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे मनाई आदेश

**सोलापूर (कटूसत्य वृत्त)**:- सोलापूर शहरात मकरसंक्राती व त्यानंतरच्या काळात पतंग उडविण्याचा उत्सव साजरा होत असून त्यासाठी नायलॉन प्लास्टिक किंवा सिंथेटीक यापासून बनविलेला मांजा मोठ्या प्रमाणात वापरला जातो. नागरिकांची सुरक्षा लक्षात घेता पोलिस आयुक्त सोलापूर शहर एम. राजकुमार यांनी दिनांक 1 जानेवारी 2026 चे 00.01 वाजलेपासून ते दिनांक 30 जानेवारी 2026 चे 24.00 वाजेपर्यंत मकरसंक्रांती उत्सवा दरम्यान पतंग उडविण्यासाठी नायलॉन, प्लास्टिक किंवा सिंथेटीक दोऱ्याचा वापर करुन पतंग उडविण्याकरीता मनाई आदेश लागू केले आहेत.

दरवर्षी मकरसंक्रात उत्सवा दरम्यान पतंग उडविण्यासाठी पक्का दोरा वापरला जातो, जो की प्लास्टिक / सिंथेटीक नॉयलॉन साहित्य वापरुन बनविलेला असतो, ज्यास सर्वसामान्यपणे नायलॉन मांजा म्हणून ओळखतात. सदर नायलॉन मांजामुळे सर्वसामान्य नागरिकांचे व पशुपक्षांचे जीविताचे रक्षण करणे हे आमचे प्रथम कर्तव्य आहे. त्या करिता पतंग उडविण्यासाठी वापरला जाणारा दोरा जो की, नायलॉन, प्लास्टिक किंवा सिंथेटीक मटेरियलने बनविला जातो, त्यावर प्रतिबंध घालणे आवश्यक आहे.

तसेच तुटलेल्या कापलेल्या पंतगाचे धागे हे जमीनीवर पडतात, सदर दोरे हे दिर्घकालीन नाश न पावणारे असून, नायलॉन / प्लास्टिक / सिंथेटीक मटेरियल हे नैसर्गिकरित्या विघटन न होणारे साहित्य आहे. हे निसर्गास व पर्यावरणास देखील घातक आहे. सदर दोरा गटारी, ड्रेनेज लाईन, पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन, नद्या, नाले तुंबण्यासाठी कारणीभुत होतो. तसेच जनावरे हे चारा खाताना चुकून नायलॉनचा मांजा खातात, त्यामुळे प्राण्यांना शारिरिक समस्या निर्माण होतात. दिवसेंदिवस पक्षांच्या संख्येत घट होताना दिसून येत आहे. पतंगाच्या मांजामुळे आकाशात उडणारे पक्षी जखमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच मांजामुळे दुचाकी वाहन चालविणा-या नागरिकांना देखील गंभीर दुखापत, अपघात होण्याचा संभव असतो. याकरिता नायलॉन प्लास्टिक किंवा सिथेटीक दोऱ्याचा वापर करुन पतंग उडविण्याकरीता प्रतिबंध करणे आवश्यक आहे.

त्यामुळे पोलीस आयुक्त, सोलापूर शहर तथा विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी एम. राज कुमार, यांनी प्रदान केलेल्या अधिकारांन्वये भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार दिनांक ०१ जानेवारी २०२६ ते दिनांक ३० जानेवारी २०२६ या ३० दिवसाच्या कालावधीमध्ये पतंग उत्सवादरम्यान पक्का दोरा जो की, नायलॉन मांजा म्हणून ओळखला जातो, जो नायलॉन /प्लास्टिक किंवा सिंथेटीक मटेरियलने बनविला जातो, असा दोरा/गांजा वापरणे, बाळगणे, विकणे व साठा करणे करीता प्रतिबंध करण्यात येत आहे. सदरचा आदेश हा दिनांक ०१ जानेवारी २०२६ चे ००.०१ वा. पासून ते दिनांक ३० जानेवारी २०२६ चे २४.०० वा. पर्यंत अंमलात राहिल.

जो कोणी व्यक्ती सदर आदेशाचा भंग करेल तो भारतीय नागरिक सुरक्षा संहिता -२०२३ चे कलम २२३ नुसार प्रमाणे शिक्षेस पात्र राहिल असे पोलीस आयुक्त सोलापूर शहर एम. राजकुमार यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# आई वडिलांची मान शरमेने खाली जाणार नाही - प्रा. तळेकर

**अकलूज (कटूसत्य वृत्त)**:- आजच्या तरुणाईने आपल्या आई वडिलांची मान शरमेने खाली जाणार नाही, असे वर्तन ठेवावे असे मत प्रा. महादेव तळेकर यांनी व्यक्त केले.

ते अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने चौंडेश्वरवाडी येथील विशेष श्रमसंस्कार शिबिरात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाळासाहेब माने



देशमुख हे होते.

आजचा युवक- काल आज आणि उद्या या विषयावर बोलताना प्रा. तळेकर पुढे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा आदर्श विद्यार्थ्यांनी आपल्या डोळ्यासमोर ठेवला पाहिजे. आपल्या देशाला विचारांचा मोठा वारसा आहे तो वारसा पुढे नेण्याचे काम आपण करायचे आहे. सध्याच्या विज्ञान युगात आपण काळाबरोबर चालायला शिकलो पाहिजे पण त्याचबरोबर आपला उत्तुंग वारसाही आपण लक्षात ठेवायला हवा तरच उज्वल भविष्य घडविता येईल

या कार्यक्रमाचे स्वागत प्रा. दत्तात्रय मगर यांनी तर प्रास्ताविक व प्रमुख वक्त्याची ओळख डॉ. सज्जन पवार यांनी केली. डॉ. विजय शिंदे यांनी आभार मानले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. स्मिता पाटील, एकनाथ बोडके, जाधवर सर व चौंडेश्वरवाडी गावातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षा केंद्राच्या परसिरात कलम 163 कलम लागू

**सोलापूर (कटूसत्य वृत्त)**:- महाराष्ट्र लोकसेवा आयोग महाराष्ट्र गट - ब परीक्षा असल्या कारणाने परिक्षा केंद्राच्या परिसरात दिनांक 4 जानेवारी 2026 रोजी सकाळी 08.30 पासून ते दुपारी 13.00 वाजेपर्यंत परीक्षार्थीना कसलाही अडथळा होउ नये. या दृष्टीने परीक्षा केंद्राच्या परिसरात बाहय उपद्रव कमी करणे परीक्षाथीर्ना कसलाही अडथळा होऊ नये या दृष्टीने परीक्षेसाठी संबंधित नसलेल्या व्यक्तीस परीक्षा केंद्राच्या परिसरात प्रवेश करण्यास पायबंद करणे तसेच परीक्षा केंद्राच्या परिसरात झेरॉक्स, पॅफेक्स, इमेल, रेडिओ, इंटरनेट सुविधा भ्रमणध्वनी (मोबाईल), संगणक गणनायंत्र (कॅल्क्युलेटर) व अशा इतर प्रकारच्या स्वरुपातील बाबी विद्यार्थ्यांना पुरवठा करण्यात येवू नये आणि सर्व संबधित शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांना त्यांचे परीक्षेशी संबंधित कर्तव्ये चोखपणे आणि कोणताही अडथळा अथवा उपद्रव न होता बजावता यावे म्हणून परीक्षा केंद्राच्या सभोवताली १०० मीटर परीसरात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागू करण्यात आले असल्याचे प्रसध्दिी पत्रकान्वये पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे/विशा), सोलापूर शहर डॉ. अश्विनी पाटील यांनी कळविले आहे. परीक्षा केंद्राच्या परसिरात खालीलप्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत.

०१ परीक्षा केंद्राच्या परिसरात कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यात येणार नाही,

०२. परीक्षा केंद्राच्या परिसरात परीक्षार्थी अथवा अन्य व्यक्तींकडून शांततेस बाधा निर्माण होईल असे कृत्य करण्यात येणार नाही.

०३. परीक्षा केंद्राचे १०० मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर, पानपट्टी, टायपिंग सेंटर, फॅक्स, एस.टी.डी. बूथ, ध्वनीक्षेपक, संगणक केंद्र, इंटरनेट कॅफे इत्यादी दळणवळणाची माध्यमे बंद राहतील. 04. परीक्षा केंद्राचे परिसरात मोबाईल फोन, पेजर सारखा दुरसंचार साधने व इतर इलेक्ट्रॉनिक गॅझेट्स स्मार्ट वॉच, फॅक्स, ईमेल व इतर प्रसारमाध्यमे घेवून परीक्षाथीर्ना प्रवेश करण्यास मनाई असेल.

05. कोणत्याही व्यक्तीकडून परीक्षा सुरळीतपणे व शांततेच्या वातावरणामध्ये पार पाडण्यासाठी कोणतीही बाधा उत्पन्न करण्यात येणार नाही.

०६. परीक्षा केंद्रावर कोणत्याही वाहनांस प्रवेशांस मनाई राहील.

7. परीक्षेशी संबंधित नसलेल्या व्यक्तींना परीक्षा केंद्रात प्रवेश नसेल केवळ संबंधित परीक्षा केंद्रावर नेमणूक केलेले मुख्याध्यापक/ कर्मचारी, शासकिय कामावरील अधिकारी व कर्मचारी संबंधित शाळेचे मुख्याध्यापक / शिक्षक/ कर्मचारी आणि उमेदवार यांनाच परीक्षा केंद्रामध्ये प्रवेश राहील. इतरांना (उमेदवारांच्या नातेवाईकासह) प्रवेश असणार नाही.

०८. परीक्षा केंद्राचे १०० मीटरचे आवारात पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र येता येणार नाही. ०९. परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परीसरात दि.०४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ०८.३० वा. ते १३.०० वा. या कालावधीत ध्वनीक्षेपके बंद ठेवावीत.

१०. परीक्षा केंद्रात परीक्षेशी संबंधित अधिकारी/कर्मचारी आणि परिक्षार्थी सोडून कोणालाही प्रवेश असणार नाही.

परीक्षा उपकेंद्राची नावे -

परीक्षा सोलापूर शहरातील एकूण ३० उपकेंद्रांवर घेण्यात येणार आहे. त्यांची नावे पुढीलप्रमाणे -

फौजदार चावडी पोलीस ठाणे परिसरात येणारे परीक्षा केंद्र :- १. श्री. दिगंबर जैन गुरुकुल हायस्कूल & ज्युनिअर कॉलेज, बाळीवेस, सोलापूर, २. बी.एफ. दमाणी हायस्कुल, १९४/१, बुधवार पेठ, सोलापूर, 3. शरदचंद्र पवार प्रशाला, मुरारजी पेठ सोलापूर, ४. संभाजीराव शिंदे प्रशाला, ९१, मुरारजी पेठ, जुनी मिल कंपाऊन्ड, सोलापूर, ५. छत्रपती शिवाजी प्रशाला, १०१- बी, मुरारजी पेठ, सोलापूर, ६. राज मेमोरीअल इंग्लिश स्कुल, जुनी मिल आवार, मुरारजी पेठ, ७. सिध्देश्वर हायस्कूल, १ सिध्देश्वर पेठ, सोलापूर, ८. सिध्देश्वर कन्या प्रशाला, सिध्देश्वर पेठ, सोलापूर. जेल रोड पोलीस ठाणे परिसरात येणारे परीक्षा केंद्र :- ९. सोलापूर सोशल आसोसिएशन्स आर्ट & कॉमर्स कॉलेज, सिध्देश्वर पेठ, सोलापूर, १०. बेगम कमुरुन्नीसा कारीगर गर्ल्स हायस्कुल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज, १४१/ए सिध्देश्वर पेठ, सोलापूर, ११. ए. आर. बुर्ला सिनिअर वुमेन्स कॉलेज, रविवार पेठ, सोलापूर, १२. कुचन हायस्कूल, ज्युनिअर कॉलेज, २७२ रविवार पेठ, सोलापूर, १३. हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, अशोक चौक, सोलापूर. जोडभावी पेठ पोलीस ठाणे परिसरात येणारे परीक्षा केंद्र :- १४. सोलापूर एज्युकेशन सोसायटीज पॉलीटेक्नीक, बुधवार पेठ, सम्राट चौक, सोलापूर, १५. उमाबाई श्रावीका हायस्कुल, १९७ बुधवार पेठ, सोलापूर, १६. र.फ चंडक इंग्लिश हायस्कुल, १९४/१ बुधवार पेठ, सम्राट चौक, सोलापूर, १७. सिध्देश्वर वुमेन्स पॉलिटेक्निक, भवानी पेठ, रुपा भवानी रोड, सोलापूर, १८. श्री. सिध्देश्वर बालमंदिर माध्यमिक स्कुल, ९१० भवानी पेठ, सोलापूर, १९. के.एल.ई. अण्णाप्पा काडादी हायस्कुल, भवानी पेठ, सोलापूर, २०. ऊइ.ऋ दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, भवानी पेठ, सोलापूर, २१. दयानंद काशीनाथ आसावा, हायस्कूल, १०१-बी, भवानी पेठ, सोलापूर. सदर बझार पोलीस ठाणे परिसरात येणारे परीक्षा केंद्र :- २२. मॉडर्न हायस्कुल, गांधी नगर, सोलापूर, २३. हरीभाई देवकरण हायस्कुल, रेल्वे लाईन्स, सोलापूर, २४. हिंदुस्थान कॉन्व्हेंट चर्च हायस्कूल १६६, रेल्वे लाईन, सोलापूर, २५. संगमेश्वर कॉलेज, १६५, रेल्वे लाईन, सोलापूर, २६. वसंतराव नाईक हायस्कुल, ९२८, नार्थ सदर बझार, सोलापूर, २७. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील, महिला महाविद्यालय मोदिखाना, सोलापूर. विजापूर नाका पोलीस ठाणे परिसरात येणारे परीक्षा केंद्र :- २८. भारती विद्यापीठ हायस्कुल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज, विजापूर रोड, सोलापूर, २९. शांती इंग्लिश मिडीयम स्कूल, न्यु संतोष नगर, सोलापूर, ३०. जागृती विद्यामंदिर हायस्कुल नेहरूनगर सोलापूर.

हा आदेश परीक्षा केंद्रावर काम करणारे अधिकारी/अंमलदार, परीक्षा केंद्रावर निगराणी करणारे अधिकारी व पोलीस अधिकारी/ अंमलदार यांचे बाबत त्यांचे परीक्षेसबंधी कर्तव्य पार पाडण्याचे अनुषंगाने लागू राहणार नाहीत. आयोगाने परवानगी दिलेल्या व्यक्तींनाच भ्रमणध्वनीचा वापर करता येईल.

इतर सर्वांना भ्रमणध्वनी नेण्यास बंदी असेल.

या आदेशाची अवमानना केल्यास भारतीय न्याय संहिता-२०२३ चे कलम २२३ नुसार गुन्हा नोंदवून फोजदारी कार्यवाही करण्यात येईल असे आदेश पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे/विशा) पोलीस आयुक्त, सोलापूर शहर डॉ. अश्विनी पाटील यांनी काढले आहेत.

## पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर

फोन क्र. (०२१८६) २२३२५३,२२३०१३ फॅक्स क्र.(०२१८६)२२३००६

ई मेलः- comcpandharpur@gmail.com

जा.क्रं./पंनपं/न.अ./निविदा/१२२/२०२५ दिनांकः- ०२/०१/२०२६

### बांधकाम विभाग

### जाहीर टेंडर नोटीस क्र-२७ सन २०२५-२६

पंढरपूर शहरातील रस्ते विषयक बांधकाम करणाऱ्या सर्व अनुभवी मक्तेदारांना / ठेकेदारांना कळविणेत येते की, खालील कामांसाठी २ पाकीट पद्धतीने टक्केवारी पद्धतीच्या निविदा मागविण्यात येत आहेत. कोरे टेंडर फॉर्म दि. ०३/०१/२०२६ पासून दि. ०९/०१/२०२६ पर्यंत नगरपरिषदेच्या बांधकाम विभागात विना परतीच्या किंमतीस मिळतील. सिलबंद निविदा दिं. ०९/०१/२०२६ रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यंत नगरपरिषद पंढरपूर यांचे मुख्य कार्यालयात स्वीकारल्या जातील. शक्य झालेस त्याच दिवशी निविदा संध्या. ५.३० वा उपस्थीतांसमोर निविदा मुख्याधिकारी कक्षात उघडली जाईल. बयाणा रक्कम निविदेसोबत डिमांड ड्राफ्ट व्दारे जमा करावी. कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा अधिकार कसलेही कारण न देता राखून ठेवले आहेत. निविदेच्या इतर अटी व शर्ती निविदा फॉर्म सोबत मिळतील. टेंडर स्विकारणे अथवा नाकारणेचे अधिकार कसलेही कारण न देता राखून ठेवले आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | कामाची मुदत | बयाणा रक्कम (रुपये) |
| --- | --- | --- | --- | --- |
| १ | शहरातील विविध मुख्य रस्त्यावरील लोखंडी जाळ्या बसविणे, गटारीचे चेंबर बांधकाम करणे, दुरुस्ती करणे व अनुषंगिक कामे करणे. | ४,२२,४८७/- | ३० दिवस | ४,२२५/- |

सही/-
मुख्याधिकारी
पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर